
पंढरीनाथ रेगे

# कथा दैनंदिनी

# आश रोज एक कथा सांगा

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : का.वा.
दा. क. ९८५८



BVBK-0401759
BVBK-0401759

BVBK-0401759
BVBK-0401759

कथा–दैनंदिनी रोज एक कथा सांगा

रोज मुलांना एक गोष्ट सांगा.
३६० गोष्टी आणि १२ पुस्तकांचा संच.

# आश्विन

पंढरीनाथ रेगे



अतुल बुक एजन्सी
प्रकाशन
३१७, नारायण पेठ, पुणे ३०

10 MAY 1985

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
[illegible]
वा. क्र. १७५८ : २८।२।८५
विषय का. वा. क्र. ........

10 MAY 1985

प्रकाशक
ना. गो. जोशी
अतुल बुक एजन्सी
प्रकाशन
३१७, नारायण पेठ
दैनिक प्रभातसमोर, पुणे ३०
फोन नं. ४४९५४१

© सर्व हक्क सुरक्षित

पहिली आवृत्ती :
२३ जानेवारी १९८५

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०.

# राष्ट्रगीत

जनगणमन अधिनायक जय हे
भारत भाग्यविधाता ।।
पंजाब सिंधु गुजरात मराठा
द्राविड उत्कल वंग ।
विंध्य हिमाचल यमुना गंगा
उच्छल जलधितरंग ।
तव शुभ नामे जागे
तव शुभ आशिष मागे
गाए तव जयगाथा
जनगणमंगलदायक जय हे
भारत भाग्यविधाता ।।
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे

मुलांचे मनोरंजन आणि बौद्धिक वाढ होण्यासाठी या कथा लिहिल्या आहेत. या कामी भारतीय सांस्कृतिक कोष आणि इतर पौराणिक कथा यांचे अनेक वेळा सहाय्य लाभले. या सर्वांचा मी ऋणी आहे. त्याबद्दल त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

---

## अनुक्रमणिका


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | नवरात्र | ५ | १९) | डाकोरची कथा | २८ |
| २) | रामलीला | ६ | २०) | जिताष्टमी | २९ |
| ३) | योगेश्वरी देवीची कथा | ७ | २१) | वेदाचार्य | ३० |
| ४) | क्षीरभवानीची कथा | ७ | २२) | वसुबारस | ३२ |
| ५) | ललितापंचमीची कथा | ८ | २३) | वाघ-मांजराचे वैर | ३३ |
| ६) | करणीदेवी | ९ | २४) | महालक्ष्मीची कथा | ३४ |
| ७) | 'ब्रतुकम्म'ची कथा | ११ | २५) | इतुपूजा | ४० |
| ८) | जीवत्पुत्रिका | १२ | २६) | काली | ४१ |
| ९) | भद्रकालीची कथा | १३ | २७) | धनत्रयोदशी | ४१ |
| १०) | विजयादशमी | १४ | २८) | नरकचतुर्दशी | ४२ |
| ११) | तुळजापूरच्या देवीची कथा | १७ | २९) | स्वत्व जागं झालं | ४३ |
| १२) | ज्वालामुखी देवी | १८ | ३०) | लक्ष्मीपूजन | ४४ |
| १३) | राष्ट्रपिता महात्मा गांधी | १९ | ३१) | आश्विन महिमा | ४४ |
| १४) | कोजागरी पौर्णिमा | २० | ३२) | म्हैसूरची कथा | ४५ |
| १५) | परळी-वैजनाथ | २२ | ३३) | टेसू नि झांझी लोकोत्सव | ४६ |
| १६) | बिहारचे देवघर | २३ | ३४) | वृक्षवात्सल्य | ४७ |
| १७) | श्रीपाद वल्लभ | २४ | ३५) | वेणुवाद्य | ४८ |
| १८) | रामायणकर्ता वाल्मीकी | २६ | ३६) | माहेजीची कथा | ४८ |

दा. क्र. १७५८ २८।२।८५
विषय वा.वा.

## १ नवरात्र

राम वनवासात असताना रावणानं सीतेला पळवून नेलं. त्यामुळं राम शोकग्रस्त झाला. त्याचं सांत्वन करायला नारद तिथं आला. त्यानं रामाला सीतेच्या पूर्वजन्माची अशी कथा सांगितली : सीता तिच्या पूर्वीच्या जन्मात एका मुनीची कन्या होती. एकदा ती तप करीत बसली होती. त्यावेळी तिला पाहून रावण मोहित झाला. आपली पत्नी व्हायला तिला सांगू लागला, पण तिनं त्याला झिडकारून लावलं. त्यावर तो संतापला आणि तिला जबरदस्तीनं ओढून नेऊ लागला. तेव्हा क्रोधानं सीतेनं त्याला शाप दिला– "पुढीलजन्मी भूमिकन्या म्हणून मी जन्म घेईन आणि तुझा नाश करीन." तीच ही तुझी पत्नी सीता होय. लंकेतल्या अशोकवनात रावणानं तिला नजरकैदेत ठेवलेलं आहे. रावणाचा नाश करूनच तू तिला परत आणू शकशील !"

रावणाचा नाश करण्याच्या कामी रामाला यश यावं म्हणून नारदानं त्याला नवरात्रव्रत करायला सांगितलं. रामानं ते केल्यावर अष्टमीच्या मध्यरात्री देवीनं त्याला दर्शन देऊन वर दिला– "तुला रावणाचा वध करण्यात यश येईल." मग व्रत पूर्ण झाल्यावर दशमीच्या दिवशी राम लंकेवर स्वारी करायला निघाला. युद्धात रामानं रावणाचा वध केला. व सीतेला सोडवून परत आणले.

आश्विन शुद्ध प्रतिपदेला नवरात्रव्रत सुरू होतं. अनेक घराण्यांत कुलाचार म्हणून हे व्रत पाळतात. घरात एका पवित्र जागी एक वेदी तयार करतात. तिच्यावर सिंहारूढ अष्टभुजादेवीची स्थापना करतात. शेजारी एक घट स्थापतात व दोहोंची पूजा करतात. व्रतधारी व्यक्तीनं नऊ दिवस उपवास किंवा नक्तभोजन करून व्रतस्थ राहायचं असतं.

आश्विन शुद्ध नवमीअखेर हे व्रत चालतं. हे नऊ दिवस सप्तशतीचा पाठ करतात व अखंड दीप लावतात. घरावर रोज एक किंवा चढत्या क्रमानं माळा बांधतात. नऊ दिवस रोज कुमारीची पूजा करून तिला भोजन घालण्याचीही प्रथा आहे. शेवटी घट व देवी यांचं उत्थापन करतात.

## २ रामलीला

रामलीला हे मुख्यत: उत्तर प्रदेशातलं धार्मिक स्वरूपाचं लोकनाट्य आहे. त्यात प्रभू रामचंद्राच्या जीवनातले काही निवडक प्रसंग नाट्यरूपानं दाखवले जातात. या रामलीलेचा प्रारंभ संत तुलसीदासानं केल्याचं सांगतात. आश्विन शुद्ध प्रतिपदेला ही रामलीला सुरू होते अन् दसऱ्याच्या दिवशी समाप्त होते.

रामलीलेच्या कालावधीत उत्तरप्रदेशातील बहुतेक खेडेगावांतून तुलसीरामायण वाचण्याची व त्याच्या श्लोकांचा अर्थ सांगण्याची प्रथाही आहे. रामलीलेचे नाट्यप्रसंग खास उभारलेल्या रंगमंचावर दाखवतात. शहरात या उत्सवासाठी एखादं मोठं मैदान निवडलेलं असतं. तिथं रंगमंचाभोवती लोक जमतात.

दसऱ्याच्या दिवशी शोभेच्या दारूनं भरलेला रावणाचा पुतळा मैदानात मध्यभागी उभा करतात. (कुठं कुठं मेघनाद व कुंभकर्ण यांचेही असेच पुतळे शेजारी उभे करतात.) रामाचं सोंग घेणारा माणूस रावणाच्या पुतळ्यावर बाण सोडतो. त्याबरोबर तो पुतळा पेट घेतो व त्यातून दारूकाम उडू लागतं. अर्थात तो पुतळा जळून खाली कोसळतो. कुठंकुठं रावणाच्या पुतळ्याला वर्तुळाकार लावलेल्या दहा तोंडांच्यामधे गाढवाचं तोंड बसवलेलं असतं.

दिल्ली शहरात तर या उत्सवासाठी रामलीला मैदानच तयार केलेलं आहे. १९२० सालापासून तिथं रामलीलेचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर होत असतो.

## ३ योगेश्वरीदेवीची कथा

मराठवाड्यातील आंबेजोगाई इथं योगेश्वरी या देवीचं स्थान आहे. या देवीच्या मंदिरात मूर्ती नसून तांदळा आहे. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत इथं नवरात्राचा उत्सव असतो. ही देवी कुमारी मानलेली असून त्या स्वरूपात तिची उपासना केली जाते. हिची कथा अशी आहे–

आंबेजोगाईपासून सोळा मैलांवर असलेल्या परळीवैजनाथानं योगेश्वरीशी विवाह करायचं योजलं. योगेश्वरीचं माहेर होतं कोकणात. तिथून परळीला यायला लग्नासाठी वऱ्हाड निघालं. वाटेत त्या वऱ्हाडानं आंबेजोगाईतील जयंती नदीच्या तीरावर मुक्काम केला. खरं तर योगेश्वरीच्या मनातून वैजनाथाशी लग्न करायचं नव्हतं. म्हणून ती या मुक्कामावरच हटून बसली. अखेर लग्नाचा ठरलेला मुहूर्तच टळून गेला. देवी खूष झाली. मग त्या खुषीच्या भरात तिनं जयंतीनदीच्या काठावरच कायमचं राहायचं ठरवलं.

□

## ४ क्षीरभवानीची कथा

काश्मीरमधे श्रीनगरपासून २० मैलांवर तुलमूला नावाच्या गावी क्षीरभवानी देवीचं मंदिर आहे. नवरात्रात इथं दहा दिवस उत्सव चालतो. शेवटी दसऱ्याला महिषासुराच्या प्रतिमेचं दहन करतात. या देवीसंबंधी पुढीलप्रमाणं एक कथा आहे–

ही देवी मूळची लंकेतली. सीतेचा शोध घ्यायला मारुती तिकडं गेला, तेव्हा ही त्याच्या दृष्टीस पडली. लंकेसारख्या प्रदेशात ती असणं अयोग्य आहे, असं वाटून त्यानं तिला उचलून आणलं आणि सध्याच्या ठिकाणी काश्मीरात ठेवलं.

क्षीरभवानी म्हणून ही देवी प्रसिद्ध असली, तरी ती आहे अष्टभुजा महिषासुरमर्दिनी. बाराव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेलेल्या कल्हण

याच्या ‘ राजतरंगिणी ’ ग्रंथात हिचा उल्लेख आढळतो. अर्थात् हे प्राचीन स्थान आहे.

या देवीचं मंदिर लहानसं पण खोल कुंडात आहे. एका झऱ्याचं पाणी या कुंडात भरतं व एका पाटातून बाहेर पडतं. ऋतुमानाप्रमाणे या पाण्याचे रंग पालटतात. या पाण्याचा रंग कधी काळा बनला, तर या प्रदेशावर संकट ओढवणार, असं तिथले लोक मानतात.

मुसलमानी राजवटीत या स्थानाची दुर्दशा झाली. सध्या अस्तित्वात असलेलं मंदिर १८६७ साली नरसिंह दयाळ या काश्मीरच्या दिवाणानं बांधलं.

## ५ ललितापंचमीची कथा

प्राचीनकाळी एका गावी एका ब्राह्मणाचे श्रीपती व गोपती असे दोन जुळे मुलगे होते. आई-बाप लहानपणीच वारल्यानं ते पोरके झाले. त्यांच्या चुलत्यानं त्यांची सर्व मालमत्ता बळकावली आणि त्यांना देशो-धडीला लावलं. हिंडतफिरत ते विशालनगरीत गेले. तिथल्या विवेक नावाच्या ब्राह्मणाला त्यांची दया आली, व त्यानं त्यांना आपल्या घरी आसरा दिला. त्यांना विद्याही शिकवली.

आश्विन महिन्यात शुद्ध पंचमीला त्या ब्राह्मणानं ललितापंचमीचं (उपांगललितेचं) व्रत केलं. ते पाहून या मुलांनी त्याबद्दल माहिती विचारून आपणही ते व्रत आचरलं. त्यामुळं लौकरच त्यांना वैभव लाभलं. थोरला मुलगा श्रीपती विद्वान झाला. तर ब्राह्मणानं आपल्या गुणवती या मुलीशी त्याचं लग्न करून दिलं.

पुढं श्रीपती आपली बायको व भाऊ यांच्यासह आपल्या गावी परतला. तोवर त्यांच्या चुलत्याला आपल्या करणीचा पश्चात्ताप झालेला होता. म्हणून पुतण्यांचं त्यानं आनंदानं स्वागत केलं. त्यानं गोपतीचंही लग्न करून दिलं, पण गोपती छंदीफंदी झाला. ललिताव्रत करीनासा

झाला. त्यामुळं त्याचं वैभव गेलं. तो दरिद्री झाला. थोरला श्रीपती मात्र नेमानं व्रत करायचा. त्याच्याकडं एकदा व्रतानिमित्त अन्नसंतर्पण चाललं होतं. त्यावेळी गोपती तिथं आला. पंगतीत जागा न मिळाल्यानं तो स्वयंपाकघरात जाऊन जेवण मागू लागला. तेव्हा भावजयीनं त्याला बाहेर घालवलं.

आपण व्रत सोडल्यानं आपल्यावर दारिद्र्य ओढवलं व आपली अशी दुर्दशा झाली, हे तो समजून चुकला. ललितेला पुन्हा प्रसन्न करून घ्यायचा निर्धार करून तो घर सोडून अरण्यात गेला. भाऊ न जेवता घरातून गेल्याचं समजल्यावर श्रीपतीला भारी वाईट वाटलं.

निराहार तप करून गोपतीनं देवीचा अनुग्रह मिळवला. मग तो फिरत निघाला. उपांगराजाच्या राजधानीत गेल्यावर ललितेचं मंदिर आढळलं. तिथं त्यानं मुक्काम केला. तर रात्री त्याला स्वप्नात देवीनं दृष्टांत दिला की, माझ्या पूजेच्या करंडयाचं झाकण राजाकडून मिळव व त्याची पूजा कर. त्याप्रमाणे राजाला विनंती करून ते त्यानं मिळवलं. ते घरी नेऊन बायकोसह त्याची पूजा केली. तेव्हा त्याला पुन्हा ऐश्वर्य लाभलं.

## ६ करणीदेवी

राजस्थानात बिकानेरनजीकच्या देशनोक या गावी करणीदेवीचं मंदिर आहे. महामायेचा अवतार मानल्या जाणाऱ्या या देवीबद्दल राजस्थानात बऱ्याच आख्यायिका प्रचलित आहेत. त्यांतली विशेष प्रसिद्ध आहे, ती अशी–

जोधपूर राज्यात सुवाप म्हणून गाव होतं, तिथं मेहोजी हा चारण राहत होता. त्याला सहाही मुलीच झाल्या. तो भगवतीचा भक्त असल्यानं त्यानं आपल्याला मुलगा व्हावा यासाठी तिची आराधना आरंभली. काही दिवसांनी ती त्याच्यावर प्रसन्न झाली. तेव्हा त्यानं 'माझं नाव


माझ्यामागून चालावं,' असा वर मागितला. 'तथास्तु' म्हणून देवी अदृश्य झाली.

पण मेहोजीला सातवी मुलगीच झाली. कारण आपल्याला मुलगा व्हावा, असा स्पष्ट वर त्यानं मागितला नव्हता. मात्र त्याच्या मागणी-प्रमाणं तिनं त्याचं नाव पुढं चालवलं. भगवतीचा अवतार म्हणून ती जन्माला आली होती. आश्विन शुद्ध सप्तमीस तिचा जन्म झाला. तिचं नाव रिधुबाई असं ठेवलं होतं, तरी ती 'करणी' या लाडक्या नावानं ओळखली गेली. ती मोठी झाली असता त्या भागात दुष्काळ पडला. म्हणून करणीदेवी तो गाव सोडून गेली. ती देशनोक या गावी आली. हे गाव त्याकाळी तिनंच वसवलं, असं म्हणतात. या गावी ती पन्नास वर्षं राहिली म्हणतात. तर ती ज्या ठिकाणी राहायची, तिथंच तिचं मंदिर उभारलं गेलं. तिचेच वंशज अजून तिथं पुजारी म्हणून आहेत.

चतुर्भुज पाषाणमूर्ती असलेल्या करणीदेवीच्या मंदिरात आश्विना-तल्या नवरात्रात भलीमोठी जत्रा भरते. या मंदिराचं विलक्षण स्वरूप असं आहे, की तिथं उंदरांचा खूप सुळसुळाट आहे. ते दिवसाउजेडीसुद्धा मंदिरभर हुंदडत असतात. त्यामुळं देवीला प्रदक्षिणा घालताना यात्रे-करूंना, त्यांच्यावर पाय पडू नये, अशा खबरदारीनं चालावं लागतं. एखाद्याला पांढरा उंदीर दिसला, तर त्याच्या रूपानं देवीनंच दर्शन दिलं, असं मानण्यात येतं.

बीकाजी या राजपुरुषाला हिच्याच वरप्रसादानं राजवैभव लाभलं, म्हणून बिकानेरच्या राजवंशाची ही पुढं कुलदेवी बनली.

राजस्थानी लोकांची करणीदेवीवर अपार भक्ती आहे.




## ७ 'ब्रतुकम्म'ची कथा

तेलंगणात ब्रतुकम्म नावाची देवता असून तिचा उत्सव आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत चालतो. त्यालाही ब्रतुकम्म उत्सवच म्हणतात. याबद्दलची कथा अशी आहे—

पूर्वीच्या काळी तेलंगणात धर्मांगद म्हणून राजा होता. त्याला शंभर पुत्र होते. पण ते सगळेजण दुराचारी निघाल्यानं प्रजेनं बंडखोरी करून त्यांना मारून टाकलं. सगळेच पुत्र गमावल्यामुळं राजा-राणी दुःखग्रस्त झाली. त्यांनी मग गौरीदेवीची उपासना करून तिची करुणा भाकली. शेवटी देवीनं प्रसन्न होऊन संतान होईल, असा त्यांना वर दिला. तिच्याच कृपेनं मुलगी झाली. तिचं नाव त्यांनी ब्रतुकम्म असं ठेवलं. देवीची ती देणगी, म्हणून तिच्या आठवणीदाखल दरसाल हा उत्सव साजरा करतात.

ब्रतुकम्मच्या नावे थाळींत किंवा पसरट टोपलीत तिळाची फुलं, कमळं व रुद्राक्ष ठेवून त्यांच्यांत पिवळ्या फुलांचे पराग मांडतात. स्त्रिया रोज मंदिरात किंवा अंगणात जाऊन गातात-नाचतात. शेवटी फराळ करतात. फराळासाठी नऊ दिवस वेगवेगळे नऊ पदार्थ आणतात.

तेलंगणात ब्रतुकम्मला गृहलक्ष्मी मानतात. उत्सवाच्या शेवटच्या दिवशी कमळाच्या पानावर ब्रतुकम्मचं प्रतीकचित्र काढून थाळीत ठेवतात व त्याची पूजा करून मग जलाशयात विसर्जन करतात.



## ८ जीवत्पुत्रिका

उत्तर प्रदेशात पुत्रवती स्त्रिया आश्विन शुद्ध अष्टमीला जीवत्पुत्रिका व्रत करतात. हे व्रत केल्यास पुत्रशोक करण्याची पाळी येत नाही, असं म्हणतात.

जीमूतवाहन नावाचा राजा एकदा अरण्यात शिकारीला गेला होता, तर तिथं मलयवती ही राजकन्या देवपूजेसाठी आलेली त्याच्या नजरेस पडली. त्याला ती आवडली, तसाच तिलाही तो आवडला. तिच्याबरोबर तिचा भाऊ होता. घरी परतल्यावर भावानं ही गोष्ट बापाच्या कानावर घातली.



ती दोघं निघून गेल्यावर जीमूतवाहन तिथल्या डोंगरावर फिरत राहिला. तर अचानक त्याला कुठूनतरी रडण्याचा आवाज ऐकू आला. त्यानं आजूबाजूला शोधून पाहिलं; तर शंखचूर्ण नावाच्या नागाची आई एके ठिकाणी रडत होती. गरुडाला नेमानं एकेक साप खाद्य म्हणून द्यायचं सापमंडळींनी कबूल केलं होतं. त्याप्रमाणं आज तिच्या

मुलाची पाळी होती. ठरलेल्या जागी जाऊन राहण्यासाठी तो आता निघत होता. ठरलेल्या वेळी गरुड तिथं येऊन त्याला मटकावणार होता. आपला मुलगा आज बळी जात होता, म्हणून त्याची आई रडत होती. ती हकीगत ऐकून राजाला तिची दया आली. तिला दिलासा देऊन तिच्या मुलाऐवजी राजा स्वतः त्या ठरलेल्या जागी जाऊन पडून राहिला. गरुडानं आल्याबरोबर बेधडक त्याच्यावर झडप घातली, तेव्हा सापाऐवजी त्या जागी माणूस असल्याचं त्याला कळून चुकलं. दुसऱ्यासाठी स्वतःचा बळी द्यायला तयार झालेल्या जीमूतवाहनाचं त्याला अपरूप वाटलं. त्याच्यावर प्रसन्न होऊन गरुडानं त्याला वर मागायला सांगितलं. राजा म्हणाला : "यापुढं तू सापांना खायचं सोडुन दे." गरुडानं त्याचं मागणं मान्य केलं. तेवढ्यात राजाला शोधीत शोधीत मलयवतीचा बाप तिथं येऊन पोचला. राजा तिला योग्य असा नवरा आहे, हे पटून त्यानं तिचं लग्न राजाशी करून दिलं–

तो दिवस होता आश्विन शुद्ध अष्टमीचा. तेव्हापासून या तिथीला हे व्रत रूढ झालं. या व्रतात उपवास करून दान द्यायचं असतं.

## ९ भद्रकालीची कथा

आश्विन शुद्ध नवमीला भद्रकाली व्रत करतात. हे व्रत केल्यानं इच्छित फलप्राप्ती होते, असं सांगितलं आहे. पार्वती म्हणजेच भद्रकाली होय. तर भद्रकाली भूतलावर कशी आली याची कथा–

एकदा शिव रावणाच्या भक्तीवर एवढा खूष झाला, की त्यानं त्याला खुशाल आपली पार्वती बहाल केली. मग रावण पार्वतीला खांद्यावर उचलून घेऊन लंकेला निघाला. पार्वतीनं मनोमन विष्णूची प्रार्थना करून आपली सुटका करण्यासाठी त्याला साकडं घातलं. विष्णूनं तत्काल ब्राह्मणाचं रूप घेतलं आणि तो रावणाला वाटेत आडवा आला; आणि त्याच्या खांद्याकडं बघत मारे हसत सुटला. रावणानं नवल करीत

विचारलं : "काय हो ब्राह्मणबुवा, एवढं हसायला काय झालं?" ब्राह्मण हसू आवरीत म्हणाला : "हसू नको, तर काय करू? ही भयंकर कुरूप स्त्री खुशाल खांद्यावर घेऊन चाललाय्?" रावण दाटून बोलला– "भलतंच काय बोलताय्? प्रत्यक्ष त्रिभुवनसुंदरी पार्वती आहे ती." ब्राह्मण पुन्हा हसून उद्गारला : "भलत्या भ्रमात दिसतेय् आपली स्वारी. खाली उतरवून एकदा नीट पाहाल तर खरं! म्हणजे पटेल माझं म्हणणं." रावणानं पार्वतीला खाली उतरवून पाहिलं, तर एक भयंकर कुरूप बाई त्याच्या पुढ्यात उभी होती. वैतागानं त्यानं तिला तिथंच टाकून दिलं आणि संतापून तो शिवाला जाब विचारायला तडक कैलासाकडं निघाला. ती काळी-कुरूप स्त्री तिथल्या तिथं मुक्काम करून राहिली. भद्रकाली म्हणून ओळखली जाऊ लागली. हे स्थान म्हणजे गोकर्ण-महाबळेश्वर.


## १० विजयादशमी

राक्षसांचा राजा दुर्गासुर (महिषासुर) यानं तप करून ब्रह्मदेवाकडून असा वर मिळवला, की, 'त्रिभुवनात तुला कोणीही पुरुषवीर जिंकू शकणार नाही.' या वराखेरीज राक्षसांचा गुरू शुक्राचार्य यांना अवगत असलेल्या संजीवनीविद्येमुळं युद्धात मरणाऱ्या राक्षसांना जीवदान मिळे. या दोन गोष्टींमुळं दुर्गासुर एवढा प्रबळ झाला, की त्यानं इंद्र, चंद्र, वरुण व यम यांना बंदिवान केलं. देवांच्या अमरपुरीचं राज्य त्यानं बळकावलं.

ब्रह्मा-विष्णू-महेशाकडं देवांनी धाव घेतली. ब्रह्मदेवाच्या वरावर कशी मात करायची या चिंतेत ते पडले. तेव्हा आदिशक्ती जगदंबा पार्वतीनं त्यांना आश्वासन दिलं : "मी अवतार घेऊन दुर्गासुराचा नाश करते. त्यासाठी तुम्ही मात्र या आश्विन शु० १ ते शु० ९ पर्यंत घटस्थापना करून रोज माझी पूजा करा आणि मला प्रसन्न ठेवा."

दुर्गासुराच्या वधासाठी पार्वतीनं घ्यावयाच्या रूपाला 'विजया'

हे नाव देऊन तिला त्यांनी विविध शस्त्रांनी सज्ज केलं. शंकरानं आपला त्रिशूळ दिला, तर विष्णूनं आपलं सुदर्शनचक्र व कवच दिलं. याशिवाय यमानं भाला, अग्नीनं गदा, सूर्यानं बाण भरलेला भाता, वायूनं धनुष्य,



वरुणानं शंख, इंद्रानं वज्र दिलं. ही शस्त्रं पेलण्यासाठी पार्वतीनं आठ बाहू धारण केले. यावरून तिला 'अष्टभुजा देवी' असंही नाव पडलं.

पार्वतीनं 'विजया' रूपानं नऊ दिवस लढून दहाव्या दिवशी दुर्गासुराचा नाश केला. सर्वत्र आनंद दाटला. हा आनंद प्रकट करण्याकरिता नवरात्र व दसरा हे उत्सव साजरे करण्याची प्रथा पडली.

विजयादशमीला सोनं लुटण्याची जी प्रथा पडली आहे, तिच्याबद्दल एक कथा आहे, ती अशी—

देवदत्त ब्राह्मणाचा कौत्स नावाचा मुलगा वरतंतू ऋषींपाशी अध्ययन करण्यासाठी राहिला. वेद-शास्त्रांत पारंगत झाल्यावर त्याचं अध्ययन संपलं. गुरूचा निरोप घेताना त्याला काहीतरी 'गुरुदक्षिणा' द्यावी, अशी त्याची इच्छा होती. पण गुरूंना गुरुदक्षिणा घ्यायची नव्हती. तरीसुद्धा कौत्सानं आग्रह धरला. तेव्हा मग वरतंतू ऋषींनी त्याला धडा शिकवण्याचं ठरवलं. ते त्याला मिस्किलपणे म्हणाले :

" गुरुदक्षिणा द्यायचा तुझा हट्टच असेल, तर तुला शिकवलेल्या चौदा विद्यांबद्दल चौदा कोटी सुवर्णमोहरा आणून दे."

एवढ्या मोहरा पैदा करायला कुणीतरी राजा गाठायला हवा होता. म्हणून दानधर्म करण्यात विख्यात असलेल्या रघुराजाकडं तो गेला. तर नुकत्याच केलेल्या यज्ञात रघुराजानं आपली सर्व संपत्ती दानधर्मांत वेचली होती. त्यामुळं सुवर्णमुद्रा शिल्लकच उरल्या नव्हत्या. आता दुसऱ्या कुणाकडं तरी जाणं आलं. कौत्स रघुराजाचा निरोप घेऊ लागला. दारावर आलेल्या याचकाला रिकाम्या हातांनी परत जाऊ द्यायचं रघुराजाच्या जिवावर आलं. त्यानं मनाशी काहीएक बेत योजला आणि कौत्साला सांगितलं : " तीन दिवस थांब. तोवर तुझी सोय करतो. "

आणि तेवढी रक्कम पैदा करण्यासाठी देवेन्द्र व कुबेर यांच्यावर स्वारी करण्यासाठी रघुराजानं प्रस्थान ठेवलं. रघुराजाचं नैतिक बळ व युद्धनैपुण्य देवेन्द्र जाणून होता. त्याच्यापुढं आपला निभाव लागणार नाही, हे लक्षात घेऊन देवेन्द्रानं कुबेराला सांगितलं– " रघुराजा चौदा कोटी सुवर्णमुद्रा हस्तगत करण्याच्या उद्देशानं ही स्वारी करतोय्. तर तू त्याच्या राजधानीबाहेरच्या शमी वृक्षावर सुवर्णमुद्रांचा पाऊस पाड. म्हणजे त्याची गरज भागेल आणि तो स्वारी रद्द करील." कुबेरानं तसं केलं. रघुराजाला मग स्वारी करण्याचं कारण नव्हतं. त्या मोहरा घेऊन जा, असं रघुराजानं कौत्साला सांगितलं. त्या मुद्रा चौदा कोटींहूनही कितीतरी जास्त होत्या. कौत्सानं त्यांतल्या फक्त चौदा कोटी घेतल्या. उरलेल्या मुद्रा घ्यायला तो तयार होईना. तर त्याला ते सारं दान दिलं म्हणून, दिलेल्या दानातलं काही परत घ्यायला रघुराजा कबूल होईना. कौत्सानं अखेर या पेचातून मार्ग काढला. 'शमीवृक्षाखाली उरलेल्या मुद्रा खुशाल लुटून न्या,' असं त्यानं नगरवासीजनांना सांगितलं. तो दिवस दसऱ्याचा होता. म्हणून त्या दिवशी शमीची आपट्याची पानं लुटून, ती सोनं म्हणून एकमेकांना द्यायची प्रथा पडली.

# ११ तुळजापूरच्या देवीची कथा

मराठवाड्यातील हे क्षेत्र देवीच्या औट पीठातलं एक मानतात. उस्मानाबाद जिल्ह्यातल्या बालाघाटच्या पठारावर हे क्षेत्र वसलं आहे. तुळजापूरच्या या तुरजादेवीबद्दल कथा आहे, ती अशी—

कृतयुगात दंडकारण्याच्या तपोभूमीत राहणाऱ्या कर्दम ऋषीची अनुभूती नावाची पत्नी होती. पतीच्या मृत्यूनंतर तिनं तप आरंभलं. तपाच्या योगानं ती तेजस्वी बनली.

एकदा कुकुर दैत्य तिथं शिकारीसाठी आला. त्यावेळी अनुभूतीला पाहून तिच्यावर तो भाळला. बेधडक त्यानं तिच्या अंगाला हात लावला. त्याबरोबर तिची समाधी भंग पावली. त्या अविचारी दैत्यापासून आपलं रक्षण करण्यासाठी तिनं आदिशक्ती पार्वतीचा धावा केला. तेव्हा पार्वती अष्टभुजा तुरजादेवीच्या रूपात प्रकट झाली आणि तिनं कुकुर दैत्याला ठार केलं, मग अनुभूतीनं त्या देवीची प्रार्थना केली, की—इतर भक्तांची संकट दूर करण्यासाठी याच रूपात तू इथं राहा.

ती प्रार्थना मान्य करून देवी तिथं राहू लागली. तेच आज तुळजापूरचं क्षेत्र.

इथल्या गोमुखतीर्थांत पाचेक फूट उंचीवरून एका गोमुखातून पाण्याची संततधार चालू असते. माथ्यावरच्या मंकावतीच्या तलावात या तीर्थाचा उगम आहे.

भवानीच्या मुख्य मंदिराच्या प्रांगणात मोठालं होमकुंड आहे, त्यासमोर दोन दीपमाळा आहेत. त्या शिवाजीमहाराजांनी बांधल्या, असं सांगतात.

देवीच्या अनेक उत्सवांत नवरात्राचा उत्सव सर्वांत मोठा असतो. या नऊ दिवसांत रोज महापूजा होते. रोज रात्री वाहन बदलून देवीचा छबिना काढतात. आश्विन शुद्ध अष्टमी-नवमीला चंडीहोम होतो. त्या रात्री पलंगाची व पालखीची मिरवणूक निघते. दसऱ्याच्या दिवशी पहाटे ही पालखी देवीपुढं आणतात. त्या वेळी एक मानकरी तेली

आपली करंगळी कापून देवीला रक्ताचा टिळा लावतो. त्यानंतर देवी शिलंगणाला जाते. सीमोल्लंघनाहून परतल्यावर देवी शयन करते, ती कोजागिरीस पुन्हा जागृत होते, असं मानतात.

## १२ ज्वालामुखी देवी

कांगडा प्रदेशात, बियास नदीच्या खोऱ्यात डोंगरांच्या पायथ्याशी ज्वालामुखी देवीचं मंदिर आहे. तिथं नवरात्रात मोठा उत्सव होतो. या उत्सवात लाखभर यात्रेकरू जमतात.


या देवीच्या मंदिरात व परिसरात ज्वलनशील वायू व उष्णोदक यांचे उद्रेक ठिकठिकाणी आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या मंदिरात प्रत्यक्षात देवीची मूर्ती अशी नाहीच. गर्भागारात मूर्तीऐवजी तीन फूट खोल असं एक कुंड आहे; व त्या भोवती प्रदक्षिणामार्ग आहे. या कुंडाच्या तळाशी असलेल्या खडकाच्या भेगांतून ज्वलनशील वायूचे उद्रेक होत असतात. भोजकी जातीचे पुजारी आहेत, ते या कुंडात तुपाच्या आहुती सतत टाकीत असतात. त्यामुळं ज्वाला उसळत राहतात. आणि या ज्वाला हेच देवीचं प्रतीक होय, असं मानलं जातं.

मंदिराच्या परिसरात सापडलेल्या प्राचीन अवशेषांवरून, इथं प्राचीन काळी एखादं मोठं नगर असावं, असा कयास करता येतो.

अकबर बादशहा व रणजितसिंह हे या देवीचे भक्त होते. अकबरानं देवीला मूल्यवान असं छत्र अर्पण केलं असून रणजितसिंहानं मंदिराला सोन्याच्या मुलाम्याचं छत चढवलं. तर रणजितसिंहाचा मुलगा खड्गसिंह यानं चांदीच्या गजांचं दार मंदिराला बसवलं आहे.

# १३ राष्ट्रपिता महात्मा गांधी

—भारताचे राष्ट्रपिता मोहनदास करमचंद ऊर्फ महात्मा गांधी यांचा जन्म आश्विनात (२ ऑक्टोबर १८६९) झाला. लहानपणापासूनच सत्य आचरण्याचा त्यांचा बाणा होता. त्यामुळं त्यांना कसोटीच्या अनेक प्रसंगांना तोंड द्यावं लागलं. हायस्कुलात शिकत असताना, पहिल्या वर्षाच्या परीक्षेत उत्तरपत्रिका लिहिताना त्यांनी एका इंग्रजी शब्दाचं स्पेलिंग चुकीचं लिहिलं. त्यावेळी देखरेख करायला असलेल्या शिक्षकानं ते पाहिलं. तर, पुढं बसलेल्या विद्यार्थ्याची उत्तरपत्रिका पाहून ते दुरुस्त कर, असं गांधीजींना त्या शिक्षकानं सांगितलं. पण त्या बालवयातसुद्धा तसं असत्य आचरण त्यांनी केलं नाही.



पुढं काही उनाड सोबत्यांच्या संगतीनं त्यांना मांसाहाराची चटक लागली. त्यापायी त्यांनी आपल्या हातातलं सोन्याचं कडंही एकदा चोरून विकलं. पण या गैरकृत्याची त्यांना तीव्र खंत वाटू लागली. आपल्या हातून हे पाप घडलं या जाणिवेची बोच त्यांच्या मनाला एवढी लागली की, त्यापायी जीव द्यावा, असाही आततायी विचार त्यांच्या मनाला चाटून गेला. मग त्यांनी ठरवलं की, आपला अपराध

कबूल करणारं पत्र वडिलांना लिहावं. तसं लिहून ते त्यांनी स्वत: त्यांच्या हातात नेऊन दिलं. त्यानंतर स्वत:ला खाणारं त्यांचं मन शांत झालं. पुढे १८८७ साली बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठी ते इंग्लंडला गेले, तेव्हा जाताना त्यांची आई पुतळाबाई हिनं सांगितल्यावरून, इंग्लंडमध्ये आपण मांसाहार, मद्यपान किंवा स्त्रीसंग करणार नाही, अशी शपथ घेतली. आणि ही शपथही त्यांनी तिथं कटाक्षानं पाळली.


बॅरिस्टर झाल्यानंतर एक खटला चालवण्याच्या निमित्तानं गांधीजी दक्षिण आफ्रिकेत गेले. तिथं युरोपीयांच्या गोऱ्या सरकारनं गौरेतरांवर 'काळे' लोक म्हणून चालवलेल्या अन्यायांचा प्रतिकार करण्यासाठी त्यांनी प्रथम सविनय कायदेभंग व सत्याग्रह यांचे प्रयोग केले. पुढे भारतात आल्यावर त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी ह्या प्रयोगांचा देशव्यापी स्वरूपावर अवलंब केला. सर्व थरांतील लाखो स्त्री-पुरुषांना बेडरपणे स्वातंत्र्यलढ्यात भाग घ्यायला प्रवृत्त केलं. यावेळी त्यांनी साधनशुचितेवरही भर दिला. १९२० साली असहकाराची चळवळ सुरू करून त्यांनी अहिंसक सत्याग्रहाचं देशव्यापी पर्व सुरू केलं. १९३० साली कायदेभंगाचा लढा चालवला. पुढे १९४२ साली 'छोडो भारत' या चळवळीत या स्वातंत्र्यलढ्याचं पर्यवसान झालं आणि अखेर १९४७ साली १५ ऑगस्ट रोजी भारताला स्वातंत्र्य मिळालं.

## १४ कोजागरी पौर्णिमा

आश्विन पौर्णिमेला कोजागरी पौर्णिमा म्हणतात. या दिवशीच्या व्रतात लक्ष्मी व ऐरावतावर आरूढ झालेला इंद्र यांची रात्री पूजा करतात.

पूजेनंतर रात्री चंद्राला आटीव दुधाचा नैवेद्य दाखवायचा असतो. रात्री जागरण करून मनोरंजक खेळ वगैरे खेळतात. मध्यरात्री लक्ष्मी चंद्रमंडलातून पृथ्वीवर उतरते व 'को जागर्ति ?'–कोण जागं आहे ?–असं विचारते. (यावरून 'कोजागरी' असं या पौर्णिमेला नाव पडलेलं दिसतं.) जो जागा असेल त्याला ती धनधान्य देते, असं एका कथेत

सांगितलं आहे.



ती कथा अशी आहे–

मगध देशात एक दरिद्री ब्राह्मण होता. महाचंडी नावाची त्याची बायको कजाग होती. दारिद्र्यानं वैतागल्यामुळं ती नवरा सांगे त्याविरुद्ध वागायची. ब्राह्मणाच्या वडिलांच्या श्राद्धाचा दिवस आला. ते श्राद्ध घरी नीटपणे कसं पार पडेल, अशी चिंता पडली. तेव्हा त्याच्या एका मित्रानं त्याला सल्ला दिला : "तुझी बायको तुझ्या सांगण्याविरुद्ध वागते ना? तर तू तुला हवं त्याच्याविरुद्ध– प्रतिकूल सांग, मग ती अनुकूल असं करील." या सूचनेप्रमाणं वागून त्या ब्राह्मणानं स्वयंपाकाच्या वगैरे बहुतेक सर्व गोष्टी बायकोकडून सुरळीत साधून घेतल्या. पण शेवटी अवधान न राहून तो तिला सहजगत्या बोलून गेला– "आता हे पिंड तेवढे नदीत सोडून ये." झालं ! सांगण्याच्या विरुद्ध वागायच्या स्वभावानुसार तिनं ते पिंड चक्क शौचकूपात नेऊन टाकले.

या प्रकारामुळं ब्राह्मण एवढा वैतागला, की तडकाफडकी घर सोडून निघाला. लक्ष्मी प्रसन्न होईपर्यंत घरी परतायचं नाही, या निर्धारानं तो तडक वनात गेला. तिथं आश्विन पौर्णिमेला काही नाग-

कन्या कोजागरी-व्रत करीत असलेल्या त्यांच्या नजरेस पडल्या. पूजा आटोपल्यावर त्यांनी द्यूत खेळण्यासाठी या ब्राह्मणाला बोलावलं. ब्राह्मण गेला; पण द्यूतात पार हरला, स्वत:जवळचं सर्व काही गमावून बसला. देवी लक्ष्मीला हा प्रकार पाहून ब्राह्मणाची करुणा आली. तिनं त्याला श्रीमंत तसंच रूपवान बनवलं. त्यामुळं या नागकन्या त्याच्यावर लुब्ध झाल्या. त्याच्याशी त्यांनी गांधर्वविवाह केला आणि त्यांना घेऊन तो घरी परतला. आधीची बायको महाचंडी हिचा स्वभाव आता बदलला. त्या सर्वांसह तो सुखासमाधानानं राहू लागला.

आश्विन महिन्यात पावसाळा संपलेला असतो. त्यामुळं आकाश निरभ्र बनतं. स्वच्छ चांदणं पडतं. अशा चांदण्यारात्री इष्टमित्रांसह मौजमजा करण्याच्या दृष्टीनं हा उत्सव प्रचारात आला असावा. जमलेल्या मेळाव्याला केशरी दूध देण्याचा प्रघात पडला आहे. राजस्थानात या दिवशी शुभ्र वस्त्रं पेहरून चांदीचे अलंकार घालण्याची प्रथा स्त्रियांत आहे.

## १५ परळी-वैजनाथ

परळी-वैजनाथ हे बारा ज्योतिर्लिंगांतलं एक स्थान असून ते मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात आहे. टेकडीवर उभारलेल्या वैजनाथाच्या मंदिराबद्दल असं सांगतात, की फक्त इथंच शंकर हा पार्वतीसह वास करतो. म्हणून या क्षेत्राला काशीपेक्षा जवभर श्रेष्ठ– ‘ जवाआगळं काशी ’ असं म्हटलं जातं.

नवरात्राप्रमाणंच आश्विन पौर्णिमेपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंत, आणि महाशिवरात्र या काळात इथं फार मोठा उत्सव होतो. हेमाडपंती बांधणी असलेल्या या मंदिरात स्वयंभू लिंग आहे. या मंदिराला दिशा-साधन असल्यानं विषुवदिनी झरोक्यातून लिंगावर सूर्यकिरण पडतात. शाळिग्राम शिळेची असलेली पिंडी हातभर उंच आहे, तर व्यास दोनेक

हात आहे. गाभाऱ्यात चार नंदादीप अखंड तेवत असतात. प्रात:काळच्या पूजेनंतर लिंगावर मुखवटा चढवतात. पूजा रोज चार वेळा होते. देवस्थानासाठी पेशवे सरकारकडून गावच्या सगळ्या ब्राह्मणांना मिळून ५,२८० बिघे जमीन इनाम मिळाली आहे.

वेगवेगळ्या काळात वेगवेगळी नावं धारण करणाऱ्या सध्याच्या या वैजनाथाला 'वैद्यनाथ' म्हणूनही ओळखलं गेलं आहे. तिथल्या पहाडावर औषधी वनस्पती मुबलक मिळत व वैद्यमंडळी अर्थातच त्यांचा उपयोग करीत. साहजिकच तिथल्या देवालाही वैद्यनाथ म्हटलं जाऊ लागलं, असं या बाबतीत सांगितलं जातं.

या नावाबद्दलची कथा अशी आहे—

देवांनी व दैत्यांनी समुद्रमंथन चालवल्यावर धन्वंतरी अमृत घेऊन वर आला. तेव्हा दैत्यांना ते लाभू नये यासाठी 'वैद्यनाथाच्या पिंडीत जाऊन लप' असं विष्णूनं धन्वंतरीला सांगितलं. त्या आदेशानुसार धन्वंतरी त्या पिंडीत लपून राहिला. मग दैत्यांचा उपशम झाल्यावर त्यांच्या नकळत ते अमृत त्यानं देवांना दिलं. त्यावरून वैद्यनाथाला धन्वंतरी व अमृतेश्वर अशीही नावं पडली. आणि देव-दैत्यांच्या युद्धात परळीनं देवांना अमृत पाजून विजयी केलं, म्हणून वैजयंती व जयंती अशा नावांनीही परळी ओळखली जाते.

## १६ बिहारचे देवघर

वैद्यनाथ नावाचं दुसरं मोठं शिवस्थान बिहारात देवघर गावी असून, काही पंडित बारा ज्योतिर्लिंगांपैकी वैद्यनाथ शिवलिंग परळीऐवजी इथलं मानतात. इथल्या शिवस्थानाबद्दलची शिवपुराणातली कथा अशी आहे—

लंकाधिपती रावणानं कठोर तप करून शंकराला प्रसन्न करून घेतलं आणि शंकरानं लंकेत वास्तव्य करावं, असा वर मागितला. पण शंकरानं लंकेत स्थापण्यासाठी त्याला एक ज्योतिर्लिंग दिलं. मात्र लंकेत

पोचण्यापूर्वी रावणानं ते पृथ्वीवर कुठंही जमिनीवर ठेवता कामा नये, असं सांगून शंकर म्हणाला, की तसं कुठं ठेवलं तर ते तिथंच रुतून बसेल.

देवांना पण ते शिवलिंग लंकेत जाऊ द्यायचं नव्हतं. म्हणून वरुणानं रावणाला लघुशंकेचा आवेग आणला. तर विष्णू वृद्ध ब्राह्मणाच्या रूपानं रावणाच्या जवळपास उपस्थित झाला. लघुशंका अनावर झाल्यानं रावणानं आपल्याकडचं शिवलिंग त्या ब्राह्मणाला थोडा वेळ धरून ठेवायला सांगितलं. पण लघुशंकेला गेलेला रावण बराच वेळ आला नाही, म्हणून ते तिथंच जमिनीवर ठेवून ब्राह्मण नाहीसा झाला. त्यामुळं ते लिंग ठेवल्या जागीच रुतून बसलं. रावणाला रिकाम्या हातांनी लंकेत परतावं लागलं.

ते लिंग मग बैजू नावाच्या भिल्लाच्या नजरेस पडलं. त्यानं त्याची जन्मभर पूजा केली. त्यावरून हे शिवलिंग बैजनाथ म्हणून ओळखलं जाऊ लागलं, पुढं बैजनाथाचं रूपांतर वैद्यनाथ या नावात झालं.

यथाकाल या शिवलिंगावर मंदिर उभारलं गेलं. मंदिराभोवती दगडी तटही आहे. आतलं शिवलिंग ठेंगणंसंच आहे. शिवगंगा नावाचं कुंड मंदिरानजीक असून त्यात स्नान केल्यावरच यात्रेकरू देवदर्शनाला जातात.

## १७ श्रीपाद श्रीवल्लभ

दत्तात्रेयाचे इतिहासकाळातले पहिले अवतार मानले जाणारे श्रीपाद श्रीवल्लभ यांची अवतारकथा 'गुरुचरित्र' ग्रंथात दिली आहे, ती अशी—

तमीळनाडूतील पीठापूर इथं श्रीपाद श्रीवल्लभ यांचा जन्म झाला. आपळराज व सुमता या त्याच्या ब्राह्मण आईबापांच्या घरी एका अमावास्येला श्राद्धाचं जेवण होणार होतं, तर तेवढ्यात दारी एक अवधूत आला, तो प्रत्यक्ष दत्तात्रेय होता. सुमतेनं भिक्षा घालताच तिच्यावर प्रसन्न होऊन तो म्हणाला : 'तुझ्या मनची इच्छा सांग.' सुमता त्याला वंदन करून

बोलली : " मला जे पुत्र आहेत ते आंधळे किंवा पांगळे असे आहेत. तर मला एखादा ज्ञानी तसाच वंदनीय असा पुत्र व्हावा, अशी इच्छा आहे. "

अवधूत तिला आशीर्वाद देत म्हणाला : " वंशाचा उद्धार करणारा, कीर्तिवंत असा तपस्वी पुत्र होईल तुला."

पुढं सुमतेला पुत्र झाला, तो दत्तात्रेयाचा प्रसाद म्हणून त्याचं श्रीपाद नाव ठेवण्यात आलं. उपनयन होईपर्यंत त्याचं वेदाचं अध्ययन पुरं झालं. त्याला सोळावं वर्ष लागताच त्याचं लग्न करण्याबद्दल घरात बोललं जाऊ लागलं. पण विरक्त वृत्तीच्या श्रीपादनं लग्नाला नकार दिला. त्यानंतर त्यानं उत्तरेत यात्रेला जाण्याची परवानगी आईबापांकडं मागितली. तेव्हा त्याची आई दुःखानं त्याला म्हणाली : " तू घर सोडून गेलास, तर आम्हाला म्हातारपणी आधार कुणाचा ? तुझा एक भाऊ आंधळा, तर दुसरा पांगळा आहे. तेही परस्वाधीन. " तेव्हा श्रीपादांनी आपल्या अपंग भावांवर करुणामय दृष्टीनं जसं काही अमृतसिंचन केलं. आणि चमत्कार घडला : दोघांही भावांची व्यंगं तत्काळ नाहीशी झाली, एवढंच नव्हे, तर ते चांगले बुद्धिमान बनले.

अशा प्रकारे आईची चिंता दूर करून श्रीपाद उत्तरयात्रेला निघाले. उत्तरेची तीर्थयात्रा संपवून ते दक्षिणेची तीर्थयात्रा करू लागले. असाच कृष्णेच्या तीरावरील कुरवपूर इथं त्यांचा मुक्काम असतानाची गोष्ट : अंबिका नावाची एक ब्राह्मणपत्नी होती.. अनेक मुलं अकाली मरून गेल्यानंतर तिचा एक पुत्र वाचला; पण निघाला पार बुद्धिहीन. या गोष्टीची हाय खाऊन बाप मरण पावला. मुलावरून लोक निंदू लागले. तसा अंबिकेनंही धसका घेतला आणि वैतागानं मुलासह कृष्णेत जीव द्यायला गेली. तर पाण्यात उतरत असताना तिला श्रीपादस्वामी तिथं स्नान करीत असलेले दिसले. आत्महत्येचं पाप आपल्याला लागू नये म्हणून मुलासह तिनं त्यांना नमस्कार केला व आशीर्वाद मागितला तेव्हा श्रीपादांनी तिला शनिप्रदोषाचं आचरण करायचा उपदेश केला आणि तिच्या मूढ मुलाच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवला. त्या-सरशी त्याला ज्ञान प्राप्त झालं.

आयुष्याचे अखेरचे दिवस श्रीपादांनी कुरवपूर इथंच घालवले व आश्विन वद्य द्वादशीला तिथंच आपला देह ठेवला. दत्तसंप्रदायी भक्त-मंडळी ही तिथी गुरुद्वादशी म्हणून पाळतात.

## २८ रामायणकर्ता वाल्मीकी

–रामायणकर्त्या वाल्मीकी ऋषींबद्दल एक-दोन कथा आहेत, त्या अशा–

(१) एक व्याध होता. त्यानं रामनामाचा जप दीर्घकाळ केला. तेव्हा त्याला वर मिळाला : 'पुढल्या जन्मी तुला वल्मीक कुलात जन्म मिळेल आणि वाल्मीकी या नावानं कीर्तिवंत होशील.' कृष्ण नावाच्या तापसानं दीर्घकाळ एवढं अखंड तप केलं, की त्याच्या अंगावर वारूळ वाढलं. म्हणून त्याचं नाव पडलं वल्मीक. त्या वल्मीकाचा पुत्र म्हणून सदर व्याध जन्माला आला, त्यामुळं तो वाल्मीकी नावानं ओळखला जाऊ लागला. पुढं त्यानं रामायण हे महाकाव्य रचलं.


(२) अग्निशर्मा नावाचा डाकू रानात वाटमारी करून दरोडे-खोरी करीत असे. एकदा सप्तर्षींशी त्याची गाठ पडली. नेहमीप्रमाणं तो त्यांच्यावर हल्ला करायला सरसावला. पण त्याला अडवून ते म्हणाले : "भल्या माणसा, वाटमारी करण्याचं हे पाप तू कुठं फेडशील ? आपल्या कुटुंबाची गुजराण करण्यासाठी हे पाप तू करतोयस ना ? तर तू असं कर; तुझ्या या पापाचे वाटेकरी व्हायला घरची मंडळी तयार आहेत का ?– असं घरी जाऊन त्यांना विचारून ये. तोवर आम्ही इथंच थांबून राहतो. आमच्यावर विश्वास ठेव."

घरी जाऊन अग्निशर्म्यानं आपल्या बायकोमुलांना विचारलं : "मी ही जी वाटमारी करतो, त्यामुळं घडणाऱ्या पापाचे तुम्ही वाटेकरी आहात ना ?" पण सर्वजणांनी बेधडक सांगितलं : "तुमचं पाप तुमच्याबरोबर. त्यात आम्ही मुळीच सहभागी होणार नाही."

ज्यांच्यासाठी आपण वाटमारी करतो, तीच माणसं आपल्या पापात वाटेकरी होण्याचं नाकारतात हे पाहून अग्निशर्मा खिन्न झाला. आपल्या आजवरच्या करणीचा त्याला पश्चात्ताप झाला. ओशाळलेल्या चेहऱ्यानं तो सप्तर्षींकडं परतला. घरी घडलेला प्रकार त्यांना सांगून तो आर्जवानं म्हणाला : “ माझ्या हातून आजवर घडलेल्या या पापाचं निवारण कसं होईल, याचा काही मार्ग सांगा.’ तेव्हा त्याला काहीएक मंत्र सांगून ते म्हणाले : “ या मंत्राचा अखंड जप करीत इथं बसून राहा. म्हणजे यथाकाल तुझं पाप दूर होईल.”

त्यांच्या सांगण्याप्रमाणं अग्निशर्मा जपसाधना करीत बसला.

अशी तब्बल तेरा वर्षं निघून गेल्यावर सप्तर्षी फिरून तिथं येऊन ठेपले. तर अग्निशर्म्यावर वारूळ वाढलेलं असून तो अखंड जप करीत



बसलेला त्यांना दिसला. तेव्हा त्याला त्यांनी त्या वारुळातून बाहेर काढलं. त्याला ‘ वाल्मीकी ’ असं संबोधून, ‘ आता तू रामायण लिही ’ असं त्यांनी सांगितलं.

क्रौंच पक्ष्यांचं एक जोडपं एकमेकांशी रममाण झालेलं असताना एका व्याधानं त्यांच्यावर बाण मारला व त्यांच्यातल्या एकाला ठार मारलं. हे अमानुष कृत्य पाहून वाल्मीकीच्या तोंडून श्लोकाच्या स्वरूपात

शापवाणी उमटली. हा श्लोक म्हणजे काव्यरूप रामायणाचा प्रेरक ठरला. करुणरसानं भरलेलं हे महाकाव्य आदिकाव्य मानलं जातं; तर वाल्मीकी आदिकवी मानला जातो. गुणसंपन्नतेमुळं रामायण हे भारतीय संस्कृतीचं मंगल प्रतीक बनलं असून तो राष्ट्रीय ग्रंथ ठरला आहे. रामायणानं शतकानुशतकं असंख्य भारतीयांना संजीवनी व प्रेरणा दिलेली आहे.

## १९ डाकोरची कथा

गुजरातेत डाकोर इथं रणछोडजीचं प्रसिद्ध मंदिर आहे. खराखुरा रणछोडजी (कृष्ण) डाकोर इथंच आहे. द्वारकेला त्याची केवळ नक्कल आहे, असं इथले लोक मानतात. त्याबद्दलची दंतकथा प्रचलित आहे, ती अशी–

बोडाणा नावाचा डाकोरचा राजपूत द्वारकेच्या रणछोडजीची भक्ती करायचा. तिथल्या श्रीकृष्णाचं दर्शन घ्यायला तो वर्षातून दोनदा, तुळशीचं रोप हाती घेऊन जायचा. पुढं म्हातारपण आलं. तेव्हा नेहमीची ही वारी त्याला झेपेनाशी झाली. एका खेपेला कृष्णाचं दर्शन घेतल्यावर त्यानं देवाला आपली अवस्था कथन केली. त्याची करुणा येऊन कृष्णानं त्या रात्री त्याला स्वप्नात येऊन सांगितलं : "यापुढं इथं येण्याची तसदी तुला घ्यावी लागणार नाही; तूच मला इथून डाकोरला घेऊन जा."

स्वप्नात झालेल्या दृष्टान्ताला अनुसरून बोडाणा द्वारकेतील कृष्णाची मूर्ती घेऊन बैलगाडीतून डाकोरकडं निघाला. तिथल्या गुगळी ब्राह्मणांना ही गोष्ट समजताच, काबा जमातीच्या काही लोकांना बरोबर घेऊन ते बोडाण्याचा माग काढीत गेले. बोडाण्याला हे समजताच आडवाटेनं त्यानं लगबगीनं डाकोर गाठलं आणि रणछोडजीची मूर्ती त्यानं घाईघाईनं तिथल्या गोमती तलावात लपवून ठेवली. तेवढ्यात पाठी-

मागून आलेल्या कावा लोकांनी त्याच्यावर बाण सोडून त्याला ठार केलं.

गुगळी ब्राह्मणांनी मग तलावाच्या काठावर बसून उपोषण आरंभलं. इकडं बोडाण्याच्या बायकोला रणछोडजीनं स्वप्नात दृष्टान्त दिला की, 'तू त्या ब्राह्मणांना माझ्या मूर्तीच्या वजनाएवढं सोनं दे आणि हा प्रश्न मिटव.' तिनं ब्राह्मणापुढं हा पर्याय मांडला. त्यांनी या गोष्टीला मान्यता दिली. पण नवल असं की, त्या मूर्तीचं वजन केलं, तर ते बोडाण्याच्या बायकोच्या नथीच्या वजनाएवढंच भरलं. नाइलाजानं तेवढं सोनं घेऊन ब्राह्मण निराश होऊन परत निघाले. त्यांना रणछोडजीनं दृष्टान्त दिला : 'चिंता करू नका. सहा महिन्यांनंतर द्वारकेतल्या सावित्री कूपात माझी मूर्ती तुम्हाला सापडेल. ती घेऊन देवळात स्थापन करा आणि तिची पूजा करीत जा."

इकडं डाकोरमधे गोमती तलावापाशी नवीन मंदिर उभारलं व तिथं रणछोडजीची मूर्ती स्थापली. या रणछोडजीला मग लोक डाकोरनाथ म्हणू लागले. आश्विनी पौर्णिमेला इथं प्रचंड यात्रा भरते.

## २० जिताष्टमी

बंगाली स्त्रिया पुत्रप्राप्तीसाठी, आश्विन वद्य अष्टमीला जिताष्टमी म्हणून व्रत करतात. या व्रताची कथा अशी—

कोणे एके काळी एका राजाला बरेच दिवस मूलबाळ नव्हतं. मूल होण्यासाठी त्यानं नाना उपाय केले; पण मूल काही झालं नाही. तर एके दिवशी त्याच्या राणीला स्वप्नात दृष्टान्त झाला, की, एका तळ्यात एक केळीचं व एक बेलाचं झाड लावून त्यांची पूजा करावी, म्हणजे पुत्रप्राप्ती होईल. तेव्हा मग राणीनं तशी झाडं लावली व त्यांची पूजा केली. आश्विनाच्या वद्य अष्टमीला ती उपवास करू लागली. त्यानंतर तिला मुलगा झाला.

तो मुलगा मोठा झाल्यावर त्याचं लग्न झालं. तर त्याच्या बायकोनं सासूच्या या व्रताची थट्टा केली. त्याचा परिणाम असा झाला,

की तिची मुलं बालपणीच मरू लागली. शेवटी त्या सुनेला पश्चात्ताप झाला व सासूच्या सांगण्याप्रमाणं तिनं जिताष्टमीचं व्रत केलं तेव्हा मग तिची मुलं जगू लागली.

## २१ वेदाचार्य

दर्भाच्या बिछान्यावर एक उंच, कृश, पिंगट रंगाचा म्हातारा अगदी क्षीण होऊन पडला होता. तो इतका म्हातारा झाला होता की, अगदी अंथरुणालाच खिळून गेला होता. तो अंथरुणावर जरी पडला होता तरी त्याचे वेदांचे अध्ययन चालूच होते.

इंद्राला याचे फार कौतुक वाटले.

इंद्र तेथे आला आणि त्याने हाक मारली, " भरद्वाजा !"

हो, ते होते भरद्वाज ऋषी.

भरद्वाजांनी पडल्यापडल्याच इंद्राला नमस्कार केला आणि तो म्हणाला, " देवेंद्रा, मला वेदांच्या अभ्यासाची फारच आवड. म्हणून तुझ्याकडून शंभर शंभर वर्षांचे तीन जन्म मी मागून घेतले. तरी वेदांचा अभ्यास काही पुरा होत नाही."

इंद्राने विचारले, " भरद्वाजा, तुला मी आणखी एक जन्म दिला तर तू त्या जन्मात काय करशील ?"

" त्याही जन्मात वेदांचाच अभ्यास करीन."

भरद्वाजांनी असे उत्तर देताच इंद्र हसून म्हणाला, " वेदांचा अंत आजपर्यंत कुणी गाठला आहे का ?"

तेव्हा भरद्वाजांनी पुन्हा उत्तर केले, " देवा, प्रयत्नांना जगात काय अशक्य आहे ? प्रयत्नांती वाळूसुद्धा रगडल्यास तेल मिळते असे म्हणतात ना ?"

" हो, खरे आहे ते," इन्द्र बोलू लागला. " पण तेच प्रयत्न तीळच रगडण्यात केले तर ? हे बघ, वेद केवढे मोठाले आहेत ते !" असे म्हणून इंद्राने योगसामर्थ्याने वेदांचे पर्वताएवढे तीन ढीग केले, आणि त्यांतील

एकेक मूठ घेऊन इंद्र भरद्वाजांना म्हणाला, " या मुठीतील एकेक कण म्हणजे एकेक वेद आहे. तू तीन जन्म केलेले वेदांचे अध्ययन म्हणजे माझ्या तीन मुठींइतकेच झाले आहे. बाकीचे पर्वताएवढे वेद तुला मुळीच माहीत नाहीत. भरद्वाजा, वेद असंख्य आहेत. या सर्व वेदांचा अभ्यास करण्याचे तू आता सोडून दे. कारण ते कधीच पूरे होण्यासारखे नाही."

यावर भरद्वाज म्हणाले, " देवा, ते शक्य नाही. वेदांचा अभ्यास अभ्यास करता करताच मी मेलो तरी पुन्हा वेदांच्या अध्ययनाकरिताच ह्या तिन्ही पर्वतांच्या कणकणाइतके जन्म मी घेईन पण वेदांचा अभ्यास काही सोडणार नाही."


इंद्राने त्यांचा हा निश्चय पाहिला आणि इंद्राला मनातून अतिशय आनंद झाला. मग त्याने भरद्वाजांना एक युक्ती सांगितली. तो म्हणाला, " भरद्वाजा ! तू ' सावित्राग्निचयन ' नावाचा यज्ञ कर. म्हणजे तुला सर्व वेदांचे अध्ययन केल्याचे पुण्य मिळेल."

भरद्वाजांनी आश्चर्याने विचारले, " देवेंद्रा, हे खरेच सांगता आपण ?"

" खरे तर ! म्हणून तो तुला मघाशी म्हणालो, की तुझा प्रयत्न तीळच रगडण्यासाठी कर."

इंद्राने सांगितल्याप्रमाणे भरद्वाजांनी ' सावित्राग्निचयन ' केले; आणि मग ते स्वर्गाचे अधिकारी झाले.

भरद्वाज हा बृहस्पती आणि त्यांची पत्नी ममता यांचा मुलगा. हा मुलगा जन्मास आल्याबरोबर ती दोघेही पतिपत्नी एकमेकांस " भरद्वाजमिम " (संभाळ याला) असे म्हणाली. म्हणून या ऋषींना ' भरद्वाज ' असे नाव पडले.



ठ. सं. ठाणे,
बा. क्र. १६५८

## २२ वसुबारस

आश्विन व० १२—या तिथीला वसुबारस किंवा गोवत्सद्वादशी म्हणतात. या दिवशी गाय-वासरांची पूजा करतात. तसंच जे व्रत स्त्रिया करतात, ते एकभुक्त राहून— म्हणजे एकच वेळ जेवून. सकाळीं वा संध्याकाळी वासरासह गाईची पूजा करतात.

तेलातुपात तळलेले पदार्थ, आणि गाईचं दूध, ताक व तूप खात नाहीत. गाईला उडदाचे वडे, भात व गोडधोडाचे पदार्थ खाऊ घालतात. या व्रताला उत्तर प्रदेशात 'बछवाँछ' म्हणतात.

समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्या, अशी कथा आहे. त्यांच्यातल्या नंदिनी नावाच्या धेनूला उद्देशून हे व्रत आहे. या व्रताची कथा अशी आहे—

एका म्हातारीची एक सून होती. घरात गुरं होती. तशीच गव्हाळी-मुगाळी वासरं होती. एके दिवशी शेतावर जाताना सासूनं सुनेला सांगितलं, की गव्हाळे-मुगाळे शिजवून ठेव. म्हणजे गहू-मूग शिजवून ठेव, असं तिला म्हणायचं होतं. पण सुनेची भलतीच समजूत झाली. गोठ्यातली गव्हाळी-मुगाळी वासरं होती ती शिजवायची, असं वाटून तिनं त्या वासरांना मारून त्यांचं मांस शिजवलं.

म्हातारी घरी परतल्यावर जेवताना, सुनेनं मांस पानात वाढलेलं पाहून म्हातारी दचकून उठली—घाबरून गेली. हा काय प्रकार आहे ?— असं विचारताच सुनेनं खुलासा केला. जेवण तसंच टाकून घाबऱ्या-घुबऱ्या म्हातारीनं देवापुढं जाऊन धरणं धरलं. तिनं देवाला विनवलं : "देवा, कोपू नकोस. आमच्यावर दया कर. माझी सून अजाण आहे. गैरसमजुतीनं तिने वासरं मारली. म्हणून तिचा अपराध पोटात घाल. आमची वासरं पुन्हा जिवंत कर."

म्हातारीनं उपासपोटी धरणं धरलेलं पाहून देवानं तिच्या हाकेला 'ओ' दिली आणि तिची वासरं जिवंत केली. म्हातारीनं मग गाई-वासरांची पूजा केली; आणि त्यांना गोडधोड खाऊ घातल्यावर मग ती स्वत: जेवली.

## २३ वाघ-मांजराचे वैर

गुजराती लोक आश्विन वद्य द्वादशीला 'वाघ-वारान' म्हणतात. या दिवशी त्यांची दिवाळी सुरू होते. घरोघरी स्त्रिया रांगोळ्या काढतात. त्यांत वाघाची रांगोळी कटाक्षानं असते. हे चित्र भाऊबीजेपर्यंत ठेवतात.

वाघ आणि मांजर यांच्या वैराची एक कथा आहे, ती अशी–

पूर्वीच्या काळी वाघ व माणसं मित्रत्वानं राहत. पुढं कधीतरी अन्नावरून त्यांच्यांत बेबनाव झाला. तेव्हा माणसांच्या सहवासात न राहण्याचा निश्चय करून वाघ जंगलात जाऊन राहिला. पण सवय नसल्यानं जंगलातल्या थंडीनं तो बेजार झाला. थंडी घालवायची, तर त्यासाठी विस्तवाची ऊब हवी. म्हणून त्यानं एखाद्या माणसाच्या घरातला थोडा विस्तव पळवून आणायला एका मांजराला सांगितलं. पण माणसाच्या घरातल्या उबदार वातावरणानं मांजर सुखावलं आणि खुशाल तिथंच राहिलं. हे वाघाला समजताच तो क्रोधायमान होऊन ओरडला : "ते मांजर मला कधी सापडू दे तर खरं; त्याचा फडशा पाडल्याशिवाय राहणार नाही मी."

तेव्हापासून मांजर वाघाला घाबरतं; व रानाच्या दिशेला कधी फिरकत नाही.

वाघाबद्दल आदिवासी त्याचप्रमाणं खेडुत लोकांत काही समज-अपसमज रूढ आहेत ते असे–

वाघाच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या माणसाचं भूत होतं. या भुताला मुंडा जमातीचे लोक 'बगाऊत' म्हणतात. वाघाकडून मृत्यू ओढवणार असला, तर हे भूत आगाऊ सूचना देतं, असं ते लोक मानतात. आणि संभाव्य अपमृत्यू टळावा म्हणून बळी देऊन बगाऊताला ते संतुष्ट ठेवतात. थारू जमातीचे लोक असा भुताला 'वाघभूत' म्हणतात. बंगाली लोकांत अशा भूताला 'बघौल' नाव आहे.

## २४ महालक्ष्मीची कथा १

एका राजाला दोन राण्या होत्या. एक होती आवडती, तर दुसरी नावडती. आवडतीचं नाव होतं पाटमाधवराणी. तर नावडतीचं होतं चिमादेवराणी. नंदनबनेश्वर नावाचा राजाचा एक शत्रू होता. तो राजाला नाना तऱ्हांनी सतावीत असे. पण तो अचानक उडे, अचानक बुडे, अचानक अंतराळात जाई, तर अचानक पाताळात जाई. त्यामुळं त्याचं पारिपत्य करणं अशक्य झालं होतं. त्याचा घोर लागल्यानं राजाची प्रकृती ढासळू लागली. राज्यातल्या लोकांना बोलावून राजा म्हणाला; "नंदन बनेश्वरचा निकाल काहीही करून लावा." लोकांनी 'हां' म्हटलं खरं, पण त्याचा शोध लागेना. ही वार्ता एका पोराला कळली. तेव्हा तो आपल्या म्हाताऱ्या आईला म्हणाला, "आई, मला भाकरी दे. राजाच्या शत्रूचा निकाल लावायला जातो." म्हातारी लेकाला म्हणाली, "तू बोलून चालून गरिबाचा पोर. भाकरीवर गुजराण करणारा. वाळलेली भाकरी खाताना लोक हसतील तुला. तर तू असं कर...रानात जाशील, तेव्हा झाडाआड लपून भाकरी खाऊन घे." म्हातारीचं सांगणं मानून, तिनं दिलेली भाकरी घेतली आणि पोर रानात गेला. काही काही लोक नंदनबनेश्वरचा इकडं तिकडं शोध घेत होते. पण तो त्यांना कुठं आढळला नाही, तेव्हा ते आपापल्या घरी परतले. राजा जास्तच काळजीत पडला.

म्हातारीचा पोर मात्र घनदाट अरण्यात पुढं पुढं गेला. म्हणता म्हणता रात्र झाली. तरीही तो रानातच मुक्कामाला राहिला. मध्यरात्रीच्या सुमाराला नागकन्या-देवकन्या तिथं आल्या, आणि महालक्ष्मीचा वसा सांगू लागल्या. पोरानं पुढं सरसावून त्यांना विचारलं, "बाई, बाई, याचं फळ काय मिळतं?" त्या म्हणाल्या– "हरवलेलं सापडतं. योजलेल्या कार्यात यश मिळतं." हे ऐकून तोही त्यांच्याबरोबर वसा सांगू लागला. पूजा केली, घागरी फुंकल्या. महालक्ष्मीमाय कोल्हापुरी जागृत झाली. तिच्याकडं नागकन्या-देवकन्या यांनी आशीर्वाद मागितला. राजाच्या शत्रूचा नाश व्हावा, असा आशीर्वाद पोरानंही मागितला.

देवी प्रसन्न होऊन म्हणाली– "राजाचा शत्रू मरण पावेल, राजा तुला अर्धं राज्य देईल, अर्धं भांडार देईल, माडीचा वाडा बांधून देईल. तुझं नाव नवलवाट ठेवलं जाईल. राजाचा वैरी उद्या राजाच्या अंगणात मरून पडलेला आढळेल." एवढं बोलून देवी गुप्त झाली. तसा म्हातारीचा लेक घरी परतला.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे उठून राणी अंगणात जाते, तर तिथं नंदनबनेश्वर मरून पडलेला दिसला. आनंदून जाऊन तिनं ती वार्ता लगेच राजाला जाऊन सांगितली. हे कसं घडलं ? म्हणून राजा चौकशी करू लागला. लोक म्हणाले, "आम्ही काल रानातून परतलो, तरी म्हातारीचा पोर दाट झाडीत दूरवर गेला होता. बहुधा त्याचंच हे काम असावं !" राजानं म्हातारीच्या लेकाला बोलावून आणलं. तो घाबरून बोलला, "मी नाही कुणाची आगळीक केली, नाही कुणावर अन्याय केला. असं असून मला गरिबाला का बोलावणं केलं ?" राजा त्याला अभय देत म्हणाला, "पोरा, तसं काही नाही. भिण्या-घाबरण्याचं कारण नाही. मला एवढंच सांग– नंदनबनेश्वर या माझ्या वैऱ्याला, कोणी बरं ठार मारला ? लोक घेतायंत तुझं नाव– खरं काय ते तूच सांग."

पोरगा बोलला राजाला– "त्याला मी नाही मारला. पण देवीनं मला वर दिला. त्यानं तो मरून पडला."

"कोणती देवी ती ? कुठं भेटली तुला ?" राजानं विचारलं. घडली गोष्ट मुलानं राजाला सांगितली.

पोराची हकीगत ऐकून राजाला समाधान झालं. त्यानं पोराला अर्धं राज्य, अर्धं भांडार तर दिलंच, शिवाय माडीचा वाडा बांधून दिला. त्याचं नावही अर्थात नवलवाट ठेवलं. पोराला अन् त्याच्या म्हातारीला झालेला आनंद काय वर्णावा ?

## महालक्ष्मी कथा २

राणीनं नवलवाटाला बोलावून घेतलं. महालक्ष्मीचा वसा कसा घ्यायचा याची माहिती विचारली. तो म्हणाला, "आश्विन महिन्या-

तल्या पहिल्या अष्टमीला सोळा सुतांचा तातू तेल-हळद लावून करावा. सोळा दूर्वा, सोळा तांदूळ घ्यावेत आणि तुळशीची पूजा पंचामृतासह करावी. सोळा अर्घ्य देऊन धूपदीपनैवेद्य दाखवावा. मग कहाणी श्रवण करावी. वसा घेणाऱ्यानं तातूची पूजा करून तो हातात बांधावा. त्यानंतर चतुर्थीला अन् चतुदर्शीला अनुक्रमे दुसरी अन् तिसरी कहाणी करावी. प्रत्येक आश्विन महिन्यात असं करावं."

राणी मग ते व्रत स्वतः करू लागली.

त्यानंतर एके दिवशी राणीबरोबर सारीपाट खेळत असताना तिच्या हातातला तातू राजाच्या नजरेला पडला. 'कशाला हे सूत हातात ?' म्हणून राजानं तिला ते तोडून टाकायला सांगितलं. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी राणीचा महाल झाडताना दासीला केरात तातू आढळला. तिनं तो नवलवाटाला नेऊन दिला. राणीच्या वागणुकीची त्याला चीड आली.' योगायोग असा, की, नावडत्या राणीची भेट घडली आणि तिनं तो तातू त्याच्याकडं मागितला. त्यानं इशारा दिला, 'उतशील–मातशील, घेतला वसा टाकून देशील !' तिनं वचन दिलं, 'उतणार नाही, मातणार नाही. घेतला वसा टाकणार नाही.' तेव्हा मग तो तातू तिच्या हवाली करून त्यानं तिला वसा सांगितला.

आश्विन महिन्याच्या पहिल्या अष्टमीला म्हातारीचं रूप घेऊन देवी महालक्ष्मी पाटमाधवराणीच्या महाली गेली, तर तिच्याकडं व्रताची कसलीच तयारी दिसली नाही. तिनं राणीला विचारलं : "तुझ्या घरी आज काय आहे ?" तर राणी बेपर्वाइनं उत्तरली : "काहीसुद्धा नाही." मग म्हातारी राणीला म्हणाली : "मला पाणी देशील, तर तुझ्या राज्याला पाणी पुरं पडेल !" राणी ठसक्यात बोलली : "तुला तांब्याभर पाणी दिल्यानं का माझ्या राज्याला पुरे पडणार आहे ?" तरीसुद्धा म्हातारी चिकाटीनं म्हणाली : "मला दहिभाताची शिदोरी देशील, तर तुझ्या राज्याला पुरे पडेल !" राणी पुन्हा ठसक्यात बोलली : "एका म्हातारीला दहिभाताची शिदोरी दिल्यानं का माझ्या राज्याला पुरे पडणार आहे ?"

तिच्या उद्धट बोलण्यानं म्हातारी कोपली अन् तिनं राणीला

शाप दिला : "सवतीच्या न्हाणीघराशी डाराडुरी करीत राहशील ! अर्धं अंग बेडकाचं, तर अर्धं माणसाचं, अशी दशा होईल !" राणीनं तिचं बोलणं हशावारी उडवून लावलं.

म्हातारी तिथून निघून गेली थेट चिमादेवीराणीच्या महालाकडं. तिथं तिला सगळीकडं गडबड दिसली. महालक्ष्मीचा मुखवटा मांडलेला होता. पूजेची तयारी चाललेली होती. म्हातारीनं तिला विचारलं : "तुझ्या इथं काय आहे आज ?" राणी उत्तरली : "महालक्ष्मीची पूजा आहे माझ्याकडं आज." म्हातारी उद्‌गारली : "अग मीच ती महालक्ष्मी !" राणीनं पुसलं : "ओळख कशी पटावी ?" कुवारीण, सुवासिनी व पोक्त बाई अशा सकाळ–दुपार–संध्याकाळच्या तीन कळा तिनं राणीला पालटून दाखवल्या. तेव्हा राणीनं तिला न्हाऊमाखू घातलं. नेसायला पीतांबर व बसायला चौरंग दिला. मग राणी व नवलवाट यांनी तिची पूजा केली. संध्याकाळी दोघंहीजणं देवीपुढं घागरी फुंकायला लागली. तो आवाज अन् धूपाचा दरवळ आलेला पाहून राजानं नोकरांना सांगितलं– "चिमादेवीराणीकडं काय चाललंय् ते पाहून या." ते तिथं महालक्ष्मीचं दर्शन घेऊन परतले. पाहिलेला प्रकार राजाला सांगितला, "मला पाहू दे काय ते," असं म्हणून राजा स्वतः तिकडं गेला. राणीनं पंचारती ओवाळून, हात धरून राजाला देवीच्या मंदिराशी नेलं. दोघं सारीपाट खेळत बसली, म्हणताना पहाट झाली. महालक्ष्मीमाय कोल्हापुरी जागृत झाली. तेव्हा राणीनं आशीर्वाद मागितला. देवी बोलली : "राजाची तू आवडती होऊन तो तुला सकाळी घेऊन जाईल. तर तुझी सवत, अर्धं अंग बेडकाचं, अर्धं माणसाचं अशा अवस्थेत तुझ्या न्हाणीघराशी डाराडुरी करीत पडेल !" चिमादेवीराणीनं प्रार्थना केली : "एवढा कडक शाप नको देऊस तिला, देवी !" तेव्हा देवी शापात फरक करून म्हणाली : "तर मग बारा वर्षं वनवास घडेल तिला." आणि देवी गुप्त झाली.

भल्या सकाळी राजानं तिला रथात बसवून आपल्या वाड्याकडं नेलं. पाटमाधवराणीला निरोप धाडला : "चिमादेवीराणीला मी घेऊन येतोय्. तिला सामोरी ये." तर तिच्या मनात अमंगळ विचार आला.

फाटकी वस्त्रं लेवून व केस मोकळे सोडून तिनं कपाळी मळवट भरला. आणि जळतं खापर डोईवर घेऊन मारे किंचाळत सामोरी गेली. अशा अवतारात ती आलेली पाहून राजाचं डोकं भडकलं. त्यानं तत्काल हुकूम सोडला– "हिला रानात घेऊन जा आणि ठार करा," आणि चिमावेव-राणीसह राजा आपल्या महाली गेला. तिच्यासह आनंदात राहू लागला.

सैनिक पाटमाधवराणीला घेऊन रानात गेले. राजाचा हुकूम ऐकून ती हमसून हमसून रडू लागली. सैनिक म्हणाले– "रडू नका. तुमच्या हातचं अन्न खाल्लंय आम्ही. तुमचा जीव घेववत नाही आम्हाला. आम्ही तुम्हाला सोडून देतो. या राज्याबाहेर निघून जा. पुन्हा इकडं येऊ नका." आणि तिला रानात सोडून सैनिक परत आले.

ती रानाबाहेर पडली अन् हिंडतफिरत एका नगरात पोचली. तिथल्या कुंभारआळीत जाते, तर तिथं नव्या राणीसाठी घडवीत होते तो नवा कळस उतरेना. म्हणून 'नवं माणूस कोण आलं आहे?' याची चौकशी त्यांनी चालवली, तर ही आढळली. तेव्हा तिला पिटून हाकलून लावलं. तिथून ही गेली कासारआळीत. तर तिथं नव्या राणीसाठी बनवत असलेला चुडा उतरेना. म्हणून 'नवं माणूस कोण आलंय्?' ते पाहू लागले, तर ही आढळली. तेव्हा हिला पिटून हाकून लावलं. पुढं सोनारआळीत ही जाते, तर तिथं नव्या राणीला घडवत असलेला नवा दागिना उतरेना. म्हणून 'नवं माणूस कोण आलंय्?' याचा तपास केला, तर ही आढळली. तेव्हा हिला पिटून हाकून लावलं. मग ही गेली साळीआळीत. तिथं साळी नव्या राणीसाठी विणीत असलेला साडा उतरेना झाला. म्हणून 'नवं माणूस कोण आलंय्?' याची चौकशी झाली. पाहिलं तर ही. तेव्हा हिला पिटून हाकन लावलं. आता मात्र ती सरळ गेली रानात.

रानात एकीकडं तिला ऋषींची गुंफा दिसली. पाहिलं, तर ऋषी बसले होते ध्यान लावून. ही तिथंच राहिली. ऋषी स्नानासाठी जायचे, तेव्हा त्यांची जागा ही झाडून सारवून ठेवायची. पूजेची तयारी करून ठेवायची. तब्बल बारा वर्षं तिनं या सेवेत घालवली. ऋषी प्रसन्न झाले. त्यांनी चौकशी केली. अभय मागून घेतलं आणि तिनं आपली सारी

हकीगत सांगितली. महालक्ष्मीच्या कोपामुळं तिची अशी दशा झाल्याचं त्यांनी जाणलं. म्हणून तिला त्यांनी महालक्ष्मीची पूजा करायला लावली. रात्री तिच्याकडून घागरी फुंकून घेतल्या. पहाटेला महालक्ष्मीमाय कोल्हापुरी जागृत झाली: तेव्हा हिनं आशीर्वाद मागितला. देवीचा तिच्यावरचा राग गेला नव्हता. ऋषींनी हिच्यासाठी क्षमा मागितली. मग देवीनं उ:शाप देत सांगितलं : या झाडापाशी पाय धुवायला पाणी ठेव. चंदनाची उटी ठेव. फराळ, कापुरी विडा नि वाळ्याचा पंखा ठेव. त्या सगळ्याला वास येईल तुझ्या हातचा. आज-उद्या राजा इकडं येईल. त्याला तहान लागेल. त्यासाठी पाणी शोधत त्याचे सैनिक येतील. त्यांना इथली व्यवस्था दिसेल. त्याबद्दल ते राजाला सांगतील. मग राजा स्वत: येईल इथं."

आणि दुसऱ्या दिवशी तिथं राजा आला. थंडगार सावलीत बसून त्यानं श्रमपरिहार केला, हातपाय धुऊन फराळ केला. पाणी पिऊन कापुरी विडा खाल्ल्यावर त्याचा आत्मा थंड झाला. आपण जे खाल्लं-प्यायलो त्या साऱ्याला पाटमाधवराणीच्या हातचा वास आल्याचं त्याला जाणवलं. म्हणून त्यानं सैनिकांना शंका पुसली— " असं कसं ?" सैनिकांनी आधी अभय मागितलं. राजानं ते दिल्यावर, आपण तिला न मारता सोडून दिल्याची खरी हकीगत त्यांनी सांगितली. राजा म्हणाला : "तर मग ती जवळच कुठंतरी असेल. शोध घ्या तिचा.

शोधता शोधता ऋषींच्या गुंफेपाशी सैनिकांना ती आढळली. सैनिकांनी येऊन सांगताच राजा उठून तिकडं गेला. ऋषींनी त्याला राणीबद्दल खुलासेवार सांगितलं. त्याला योग्य तो बोध केला. राणी-कडून राजाला नमस्कार करवला. मग तिला त्याच्या हवाली केलं. राजा-राणीनं जोडीनं ऋषींना नमस्कार करून त्यांचा निरोप घेतला. मग राणीला रथात बसवून राजा तिला राजनगरीत घेऊन गेला. राज-वाड्यापाशी पोचताच चिमणदेवराणीला निरोप पाठवून सामोरी यायला सांगितलं. तशी न्हाऊनमाखून पीतांबर नेसून, अलंकार लेवून चिमणदेव-राणी वाजतगाजत सामोरी आली. राजानं पाटमाधवराणीला म्हटलं : " तू त्यावेळी अशाप्रकारं सामोरी आली असतीस, तर तुझे हाल झाले

नसते." तिला पटलं नि ती मुकाट बसली. मग चिमणदेवराणीला रथात घेऊन त्या दोघींसह राजानं वाड्यात प्रवेश केला. त्या दोघींसह तो सुखासमाधानानं राहू लागला.

## २५ इतुपूजा

आश्विनातल्या सूर्यसंक्रांतीला बंगालमधील स्त्रिया इतू या देवतेची पूजा करतात. तिकडची ही देवता नवसाला पावते, अशी त्या स्त्रियांची समजूत आहे. इतूचा सूर्याशी संबंध आहे, असं मानतात. मातीच्या मोठाल्या परळात, माती घातलेली चार छोटी बोळकी ठेवतात. त्यांच्यांत भात, जंव, गहू किंवा इतर धान्य पेरतात. या 'शेता'ला दर रविवारी पाणी घालतात. तांदळाची खीर व मिठाई हा नैवेद्य इतूला दाखवतात. नंतर तिची कहाणी ऐकतात. ती कहाणी अशी आहे—

एक दरिद्री ब्राह्मण होता. तो होता भारी अधाशी. एकदा त्याला धिरडं खावंसं वाटलं. त्याच्या सांगण्यावरून बायकोनं धिरडी केली. पण जुम्नो व उम्नो या त्याच्या दोन मुलींनी एकेक धिरडं खाल्लं. त्यामुळं ब्राह्मणाला धिरडी भरपेट खायला नाही मिळाली. त्या मुलींचा त्याला राग आला आणि त्यासरशी त्या दोघींनाही त्यानं रानात नेऊन सोडलं. तिथं काही रानपऱ्या इतू देवीची पूजा करीत होत्या. त्यांच्याबरोबर या मुलींनीही पूजा केली. आपल्या बापाला श्रीमंत बनवावं अशी विनवणी त्यांनी देवीला केली. त्यांच्या पूजेनं प्रसन्न झालेल्या देवीनं त्यांची मनोकामना पूर्ण होईल, असा आशीर्वाद दिला. आणि त्या घरी परतल्यावर त्यांचा बाप श्रीमंत झाला.

## २६ काली

देवादैत्यांचं युद्ध झालं, तेव्हा प्रथम देवांचा पराभव झाला. म्हणून देवांनी ब्रह्मा-विष्णू-महेश यांच्याकडं धाव घेतली, पण दैत्यांचं पारिपत्य करायला महाकालीच समर्थ ठरेल हे जाणून या तिघाही देवश्रेष्ठांनी महाकालीची प्रार्थना केली. मग महाकालीनं कालीदेवीची उत्पत्ती केली. दारूक नावाच्या दैत्याचा वध तर केवळ स्त्रीकडून होणं शक्य होतं. म्हणून शंकरानं आपल्या कंठातल्या विषातून कालीची उत्पत्ती केली, असं लिंगपुराणात म्हटलं आहे.

कलकत्त्यातील कालीच्या प्रख्यात मंदिरात कालीचं उग्रचंडी रूप रत्नजडित सिंहासनावर आरूढ झालेलं आहे.

हे कालिमंदिर संपन्न आहे. कारण तिथं सतत गर्दी करणारे यात्रेकरू व भक्त-भाविक देवीपुढं कमी-अधिक नाणी अर्पण करतात. त्यामुळं लाखो रुपये जमत असतात. बंगाली स्त्रियांची तर कालीदेवीवर अमाप भक्ती. चतुर्भुज, काळ्या रंगाची, विकटहास्य करणारी दक्षिणकालीदेवीची मूर्ती बंगालमधे विशेष लोकप्रिय आहे.

## २७ धनत्रयोदशी

आश्विन व. १३ : या दिवशी मानण्यात येणाऱ्या धनत्रयोदशीला वस्त्रं तसेच अलंकार खरेदी करणं शुभ मानतात. या दिवशी उपवास करतात आणि घरातले ठेवणीतले अलंकार काढून साफसूफ करून ठेवतात. कुबेर, विष्णु-लक्ष्मी, योगिनी, गणेश, नाग आणि द्रव्यनिधी यांची पूजा करून पायसाचा नैवेद्य दाखवतात. यमासाठी दिवे लावतात. दानधर्मही करतात.

यमराजाला प्रसन्न करण्यासाठी या दिवसापासून यमद्वितीयेपर्यंत–पाच दिवस घरासमोर दिवे लावण्याची प्रथा आहे. त्याबद्दलची कथा अशी आहे–

हेम नावाचा राजा होता. त्याच्या पुत्राचं लग्न झालं, पण त्यानंतर चार दिवस उलटण्यापूर्वीच धनत्रयोदशीच्या दिवशी तो मृत्यू पावला. या दुर्दैवी घटनेमुळं राजवाड्यात सगळीजणं दुःखानं आकांत करू लागली. यमाचे दूत राजपुत्राचे प्राण न्यायला आले, तेव्हा तो आकांत पाहून त्यांचंही काळीज गलबललं. त्याचे प्राण न्यायला त्यांचं मन घेईना. ही गोष्ट यमाला कळल्याबरोबर स्वत: तो तिथं येऊन ठेपला. राजवाड्यातल्या माणसांबरोबर आपले दूतही रडत बसलेले पाहून यमालाही कसंसंच वाटलं. तो विचारात पडला. मग तो बोलला, " आजपासून पाच दिवस जे लोक आपल्या घरासमोर रोज दिवे लावतील, त्यांच्यावर अपमृत्यूची आपत्ती ओढवणार नाही. "

देवांचा वैद्यराज, आयुर्वेद सांगणारा धन्वंतरी याची जन्मतिथी हीच मानतात आणि भारतातील वैद्यमंडळी याची पूजा या दिवशी कृतज्ञतापूर्वक करतात.

गुजराती व्यापारी वगैरे लोक या तिथीला ' धनतेरस ' म्हणतात आणि घराची नि दुकानाची सजावट करून द्रव्याची पूजा करतात.

## २८ नरकचतुर्दशी

आश्विन व. १४ : या तिथीला नरकचतुर्दशी मानतात. या दिवशी सूर्योदयापूर्वी सुगंधी उटणं-तेल अंगाला लावून अभ्यंगस्नान करतात. पावसाळ्यानंतरचं नवीन भातपीक हाती आलेलं असतं. म्हणून कोकणात नव्या तांदळांचे पोहे कांडून त्यांचे गुळाचे, दह्याचे व तिखटाचे पोहे बनवून खातात. इतर ठिकाणी, शहरांतून वगैरे दिवाळीनिमित्त बनवलेले फराळाचे पदार्थंही खातात. नरकचतुर्दशीबद्दलची पौराणिक कथा आहे, ती अशी—

प्राग्ज्योतिषपुराचा नरकासुर म्हणून राजा होता. भूदेवीकडून त्याला वैष्णवास्त्र लाभल्यामुळं तो बलाढ्य बनला. अनेक राजांच्या एकूण सोळा हजार कन्या पळवून आणून बंदिवासात ठेवल्या. देवांनाच काय, पण खुद्द देवेंद्रालाही तो ताप देऊ लागला. शेवटी देवेंद्रानं श्रीकृष्णाची करुणा भाकली. तेव्हा श्रीकृष्णानं नरकासुरावर स्वारी करून त्याला

ठार मारलं. त्याच्या बंदिवासातल्या सोळा हजार नारींना मुक्त केलं. तो दिवस होता आश्विन वद्य चतुर्दशीचा. मरताना नरकासुरानं कृष्णाकडं वर मागितला की, "आजच्या तिथीला अभ्यंगस्नान करून जे लोक दिवे उजळतील त्यांना नरकाची पीडा होऊ नये." कृष्णानं तसा वर दिला. तेव्हापासून ही तिथी नरकचतुर्दशी मानली जाऊ लागली. त्या दिवशी भल्या पहाटे उठून अभ्यंगस्नान करायचं आणि नरकासुराचं प्रतीक म्हणून कारिट पायाखाली चिरडायचं अशी प्रथा लोकांत पडली. कोकणातले लोक पायातळी कारिट चिरडताना 'गोविंदा, गोविंदाऽऽ' असा घोष करतात.

दीपावलीचा उत्सव मुख्यत: याच दिवसापासून, दिव्यांची आरास करून सुरू होतो. हा दीपोत्सव कमी-अधिक स्वरूपात भारतभर साजरा केला जातो. धनत्रयोदशीपासून कार्तिक शुद्ध प्रतिपदा– बलिप्रतिपदा असे चार दिवस दीपावलीचा सण मानला जातो.

चौदा वर्षांचा वनवास संपवून रामचंद्र सीता व लक्ष्मण यांच्यासह अयोध्येस याच दिवसांत परतला आणि तिथल्या लोकांनी दीपोत्सव साजरा केला. तेव्हापासून दरसाल या दिवसांत हा उत्सव साजरा करण्याची प्रथा पडली, अशी काही लोकांची श्रद्धा आहे.

## २९ स्वत्व जागं झालं.

वेदांमधली गोष्ट : सिंहाचा एक छावा अगदी बाळपणापासून शेळ्यामेंढ्यांच्या कळपात वाढत गेला. त्या कळपाबरोबरच त्या ठराविक जंगलभागात तो चरायला जायचा आणि बकरीचं दूध पिऊन राहायचा.

एके दिवशी एक सिंह त्या भागात आला असता त्यानं हा कळप पाहिला. त्याबरोबर त्यानं त्या कळपावर झडप घातली अन् एक मेंढी जबड्यात पकडून तो निघून गेला. आपल्या जातभाईचं हे कृत्य सिंहाच्या या छाव्यानं नवलानं पाहिलं. त्या सिंहासारखेच आपण असल्याचा साक्षात्कार त्याला झाला. म्हणजे शेळ्या-मेंढ्या वगैरे प्राणी मारून खायचं हे आपल्या जातीचं नैसर्गिक भक्ष्य आहे, हे त्यानं जाणलं. तेव्हापासून तोही शेळ्या-मेंढ्या मारून खायला लागला.

## ३० लक्ष्मीपूजन

आश्विनी अमावास्येच्या दिवशी लक्ष्मीपूजन करतात. लक्ष्मी, विष्णू, कुबेर इ. देवांची आणि आपल्याकडच्या धनाची पूजा या दिवशी दिवेलागणीला करतात. मुख्यत: व्यापारीवर्ग आपापल्या दुकानात हा पूजाविधी उत्सवपूर्वक साजरा करतात. याची कथा अशी–

आश्विनी अमावास्येच्या रात्री देवी लक्ष्मी सगळीकडं फिरते व राहण्यासाठी योग्य स्थान शोधत असते. ज्या ठिकाणी स्वच्छता, शोभा, रसिकता दिसून येते तिकडे ती ओढ घेते. त्याचप्रमाणे ज्या घरात चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष, संयमी, धर्मनिष्ठ, देवभक्त पुरुष आणि गुणवती तशाच पतिव्रता स्त्रिया असतात, त्या घरात राहणं तिला पसंत पडतं.

या अमावास्येच्या दिवशीच अवतारी वामनानं बळीराजाला पाताळात लोटून लक्ष्मीची सुटका केली, त्या घटनेबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठी लक्ष्मीपूजनोत्सवाचा आनंद साजरा करण्याची प्रथा पडली.

□

## ३१ आश्विन महिमा

भारतीय मासगणनेतला हा सातवा महिना म्हणज शरदऋतूचा पहिला मास. याला ‘ इष ’ असंही म्हणतात. या महिन्याच्या पौर्णिमेच्या सुमारास आश्विनी नक्षत्र असतं, त्यावरून याला आश्विन हे नाव मिळालं. या महिन्यात सूर्याचं तुला राशीत संक्रमण होतं.

अनेक धार्मिक विधी व उत्सव असलेल्या या महिन्यातील धर्मकृत्यांचा प्रारंभ नवरात्राच्या घटस्थापनेनं होतो. शुद्ध प्रतिपदेस मातामहश्राद्ध, तर चतुर्थीस सतीची पूजा. त्याच दिवशी सुवासिनींचा सन्मान. पंचमीस कुशतृणानं बनवलेल्या नागांची नि इंद्राणीची पूजा. त्याच दिवशी ललितेची पूजा. त्याच पक्षात मूळ नक्षत्रावर सरस्वतीचं आवाहन. मग पूर्वाषाढा नक्षत्रावर तिची स्थापना, उत्तराषाढा नक्षत्रावर तिची

पूजा आणि शेवटी श्रवण नक्षत्रावर तिचं विसर्जन. नवमीस हत्यार-अवजार-आयुधांची पूजा आणि दुर्गादेवसाठी हवन नि बलिदान. दशमीस दसरा– सीमोल्लंघन. त्यानंतर पौर्णिमेस नवान्नभक्षण आणि कार्तिक-स्नानाचा प्रारंभ. वद्य पक्षात द्वादशीस गोवत्सांची पूजा. त्याच दिवशी दत्तात्रेयाचा उत्सव. त्रयोदशीस यमासाठी दीपदान. चतुर्दशीस दिवाळीचं अभ्यंगस्नान. अमावास्येच्या दिवशी लक्ष्मीपूजन.

घृतदान हे या महिन्यातलं विशेष कृत्य. गाय, बैल, घोडा, तीळ, दही इ. दानं केल्यानं पद्मनाभ संतुष्ट होतो, असं म्हटलेलं आहे. तमिळ-नाडूमधे या महिन्याला तुलामास म्हणतात व विशेषतः या महिन्याच्या अमावास्येला कावेरी नदीत स्नान करतात.

या महिन्यातील पौर्णिमेला सायंकाळी आई आपल्या सर्वांत मोठ्या अपत्याला ओवाळून त्याचं औक्षण करते व त्याला प्यायला दूध देते. याला मुलाची आश्विनी करणं असं म्हणतात. विशेषकरून महाराष्ट्रात हा प्रघात आहे.

## ३२ म्हैसूरची कथा

कर्नाटकातील म्हैसूर या प्रसिद्ध शहराची कथा नावापासूनच सुरू होते. म्हैस + ऊर मिळून म्हैसूर हा जोडशब्द बनलाय. म्हैस म्हणजे महिष आणि ऊर म्हणजे गाव किंवा प्रदेश. ११ व्या व १२ व्या शतकात महिषनाडू अर्थात महिषदेश म्हणून याचा उल्लेख होई. यासंबंधीची कथा अशी आहे–

प्राचीन काळी कधीतरी महिष नावाचे लोक इथं राहत होते. (निलगिरी पर्वतावरचे तोड नावाचे लोक पूर्वीचे महिष लोकच होत.) या प्रदेशावर तेच सत्ता गाजवीत होते. यादव गोपालक, तसे हे लोक महिषपालक होते. या दोन्ही जमातीच्या लोकांत वैर उद्भवलं. कारण यादव या प्रदेशात आपली वसाहत स्थापू पाहत होते; तर त्या लोकांना

आपल्या टापूत येऊ द्यायचं नाही, असा महिषजनांनी निर्धार केला होता. यावरून पुढं त्यांच्यात प्रत्यक्ष युद्ध सुरू झालं. त्यात जगदंबेनं गोपालकांना साहाय्य केलं. त्यामुळं महिषजनांचा पराभव झाला.

तर महिषजनांचा संहार करणारी म्हणून जगदंबा 'महिषासुर-मर्दिनी' या नावानं प्रसिद्ध झाली. यादवांनी पुढं तिला आपली कुल-स्वामिनी बनवलं. म्हैसूरचा नवरात्राचा भव्य उत्सव या महिषासुर-मर्दिनीचाच उत्सव म्हणून तेव्हापासून साजरा करण्यात येऊ लागला.

## ३३ टेसू नि झांझी लोकोत्सव

व्रजमंडळात 'टेसू नि झांझी' हा लोकोत्सव नवरात्रात होतो. मातीचे घडे बनवून त्यांच्यावर दिवे पेटवून ठेवतात. या घड्यांना म्हणतात झांझी. हे घडे माथ्यावर घेऊन गावातल्या मुली गाणी म्हणत घरोघर हिंडतात. तर तरुण पोरगे 'टेसू' नावाचा मुखवटा घेऊन टोळीटोळीनं गावात फिरतात. टेसू म्हणजे वेळूच्या तीनेक फुटांच्या तीन काठ्या मध्यभागी एकत्र बांधतात व त्यांचं तिकाटणं बनवतात. त्याच्या वरच्या एका टोकावर पगडीधारी टेसूचा मुखवटा बसवून बाकीच्या दोन टोकांवर दिवे लावतात. कुणी कुणी तिन्ही टोकांवर टेसूचे मुखवटे चढवतात.

हा कार्यक्रम आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत चालतो. शेवटी झांझी अन् टेसू यांचं लग्न लावतात. त्यांची पूजाही करतात. अखेर तळ्यात-तलावात वगैरे त्यांचं विसर्जन करतात.

यासंबंधी पुढीलप्रमाणं लोककथा आहे–

भारतीय युद्धात एके दिवशी युधिष्ठिरानं आपल्या पक्षातील वीरांना विचारलं, "कौरवांचा पराभव किती दिवसांत करता येईल?" त्यावर अर्जुन उद्गारला, "एका दिवसात मी कौरवांचा नाश करीन." तेव्हा बर्बरीक नावाचा योद्धा ऐटीत बोलला, "मी तर अवघ्या दोन

घटकांत त्यांचा नायनाट करीन." श्रीकृष्णाला त्याच्या या घमेंडीची चीड आली. त्यानं सुदर्शन चक्रानं तत्काल त्याचं डोकं उडवलं. पण तरीसुद्धा त्याचं डोकं जिवंत राहिलं. त्यानं श्रीकृष्णाला विनवलं: "भगवान्, तू मला मारल्याचं दु:ख वाटत नाही, पण हे भारतीय युद्ध डोळ्यांनी पाहण्याची इच्छा होती."

त्याची ही इच्छा पुरी करण्यासाठी श्रीकृष्णानं तीन बाण एकत्र बांधून त्यांचं तिकटं बनवलं. त्यांतल्या मधल्या बाणाच्या टोकावर बर्बरीकाचं डोकं बसवलं. आणि त्या तशा अवस्थेत त्यानं सर्व भारतीय युद्ध पाहिलं.

नरकासुराच्या एका कन्येचं या बर्बरीकावर प्रेम बसलं होतं. युद्ध समाप्त झाल्यावर श्रीकृष्णानं त्या कन्येचा बर्बरीकाशी विवाह लावून दिला.

तर टेसू व झांझी ही या लोककथेतील अनुक्रमे बर्बरीक व नरकासुरकन्या यांची प्रतीकं मानली जातात.

---

## ३४ वृक्षवात्सल्य

रावणाला मारल्यानंतर रामचंद्र पुष्पक विमानानं लंकेहून अयोध्येला परत जायला निघाला, त्यावेळचा रामायणातला हा प्रसंग आहे—

अयोध्येच्या मार्गावर विमान पंचवटीवरून जाऊ लागलं. तेव्हा खाली बोट दाखवीत, सीता रामचंद्रांना म्हणाली, "आपण इथं राहत होतो, तेव्हा इथं झाडांची काही रोपं लावली होती मी. ती आता कशी-काय आहेत, नीट वाढलीयत् की नाहीत ते पाहण्याची इच्छा झाली आहे."

सीतेच्या इच्छेखातर मग रामचंद्रांनी विमान खाली– पंचवटीत उतरवलं. आपण लावलेली झाडं नीट वाढत आहेत, असं दिसून येताच सीतेला समाधान वाटलं. सीतेच्या मागून तिथल्या ऋषीमुनींनी त्या झाडांची नीगा तत्परतेनं राखलेली होती.

आपण ज्यांना आस्थेनं खत-पाणी घातलं, ते बालतरू नीट वाढले आहेत की नाहीत, हे पाहण्यात सीतेची दिसून आलेली वात्सल्याची भावना पाहून रामचंद्रांना संतोष वाटला.

## ३५ वेणूवाद्य

काही वर्षांपूर्वी एक भारतीय गृहस्थ उच्च शिक्षणासाठी जर्मनीला गेले होते. एके दिवशी त्यांच्या विद्यापीठातील देशोदेशींच्या विद्यार्थ्यांचा मेळावा भरला. प्रत्येक देशाच्या एकेका विद्यार्थ्यानं आपापल्या देशाचं राष्ट्रीय वाद्य वाजवून दाखवलं. कुणी व्हायोलिन, कुणी दुसरं काहीतरी. गृहस्थालाही त्याचं राष्ट्रीय वाद्य वाजवून दाखवण्याबद्दल सांगण्यात आलं. पण भारतीय गृहस्थ गप्पच बसले. बाकीची मंडळी विचारू लागली– "वाजवण्याचं एक वेळ राहू द्या. पण तुमचं राष्ट्रीय वाद्य कोणतं ते तरी सांगा."

ह्या गृहस्थाला काही सांगता येईना.

मागाहून भारतात परतल्यावर हा गृहस्थ विनोबांच्या भेटीस गेला असता सहज म्हणून त्यानं विनोबांना हा प्रसंग सांगितला. त्यावर विनोबा तत्काल त्याला म्हणाले, "अहो, आपलं राष्ट्रीय वाद्य बासरी नाही का ? भारताच्या खेड्याखेड्यातून आढळेल तुम्हाला ते. साधंच पण मधुर. श्रीकृष्ण भगवानानं पवित्र केलंय ते. वाद्य तरी किती साधं ? घेतली बांबूची हातभर नळी, पाडली चार-पाच भोकं, की झालं तयार."

---

## ३६ माहेजीची कथा

जळगाव जिल्ह्यातल्या चिंचखेड इथं माहेजी नावाचं यात्रास्थान आहे. तिथं पौष पौर्णिमेला यात्रा भरते. या यात्रेविषयी आख्यायिका आहे, ती अशी–

तीनेकशे वर्षांपूर्वी जामनेरजवळच्या हिरवी या गावी माहेजी नावाची एक कुणबी स्त्री होऊन गेली. सासूसासरे तिचा भारी छळ करीत. अखेर तो छळ असह्य होऊन ती घरातून गुपचूप पळून गेली. तोरणमाळच्या एका साधूनं तिला योगिनीची दीक्षा दिली. त्यानंतर ती तीर्थयात्रा करीत देशभर फिरली. त्यामुळं भाविक लोक तिला देवतेसमान मानू लागले. तीर्थयात्रा पुरी झाल्यावर ती चिंचखेड गावात स्थायिक झाली. बारा वर्षं वास्तव्य झाल्यानंतर तिथंच तिनं जिवंत समाधी घेतली. लोकांनी तिथं तिचं मग मंदिर बांधलं.

BVBK-0401759